# सृजनरंग



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष : सृजनरंग


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रेरणा** : **मा. वन्दना कृष्णा,** (भा.प्र.से.)
  अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शन** : **मा. विशाल सोळंकी,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : **एम. देवेंदर सिंह** (भा.प्र.से.)
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक** : **रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **विकास गरड**
  प्राचार्य, (समन्वय विभाग)
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

  **मनिषा यादव**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती समन्वयक** : **सुवर्णा पवार**
  विषय सहायक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **तज्ज्ञ समिती** : **डॉ. संदीप पवार** (वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रत्नागिरी)
  **राणी पाटील** (अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर)
  **संदीप वाकचौरे** (विषय सहायक, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अहमदनगर)
  **तरुबेन पोपट** (निवृत्त मुख्याध्यापिका, पुणे)
  **सुवर्णा देशपांडे** (माध्यमिक शिक्षिका, डे.ए.सो. न्यू इंग्लिश स्कूल सातारा)
  **निवृत्ती आहेर** (मुख्याध्यापक, भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय आदर्श शाळा भोयेगाव, जि. नाशिक)
- **मुखपृष्ठ रचना** : **नीताली हरगुडे** (कला शिक्षिका, सरिता विद्यालय, पुणे)
- **मलपुष्ठ रचना** : **विवेकानंद पाटील** (कलासाम्राज्यम, पुणे)
- **प्रथम आवृत्ती** : जानेवारी २०२२
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.

# सृजनरंग

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष




राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

# प्रस्तावना

सन २०२० आणि २०२१ या आव्हानात्मक वर्षात उद्‌भवलेल्या परिस्थितीला आपण सर्वच जण अतिशय संयमाने सामोरे जात आहोत. विद्यार्थ्यांचे शालेय शिक्षण सुरू रहावे यासाठी शालेय शिक्षण विभागामार्फत विविध कार्यक्रमांची अंमलबजावणी सुरू आहे. याबरोबरच आपण सर्वजण आपल्या शाळेमध्ये वैविध्यपूर्ण उपक्रम कल्पकतेने राबवीत आहोत.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०२०/प्र.क्र. १४३/एस.डी.६, दि. ५ मार्च, २०२१ अन्वये राज्यात ४८८ शाळांची आदर्श शाळा (Model School) म्हणून निवड करण्यात आली. या शाळांमध्ये सुरू असणारे विविध उपक्रम राज्यातील इतर शाळांपर्यंत पोहोचावेत, तसेच यापासून प्रेरणा घेऊन नवनवीन उपक्रम आपल्या शाळेमध्ये कल्पकतेने राबवून शालेय गुणवत्तेचा आलेख उंचावण्याच्या उद्देशाने 'सृजनरंग' या ई-अंकाची निर्मिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून करण्यात येत आहे.

आपण सर्वजण जाणतो, एकविसावे शतक हे गतिमान असून अनेकविध क्षेत्रात सातत्याने बदल घडत आहेत. कोवीड-१९ या महामारीने शिक्षण व्यवस्थेपुढे अनेक आव्हाने निर्माण केली आहेत. उदा. अध्ययन गती (लर्निंग लॉस), तांत्रिक साधनांच्या पुरवठ्यातील अडथळा, १००% विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचणे इत्यादी. अशा परिस्थितीला यशस्वीपणे सामोरे जाण्यासाठी आपल्या ठायी आत्मविश्वास निर्माण करून जगणे सुकर करणे, जाणीवपूर्वक ज्ञान प्राप्त करून कौशल्ये अंगीकृत करणे ही सध्या काळाची गरज आहे.

एकविसाव्या शतकातील शिक्षण हे सर्जनशील, चिकित्सक विचार, सहयोग, सहकार्य आणि संप्रेषण/संवाद यावर भर देणारे आहे. माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात वेगाने प्रगती झाल्यामुळे विद्यार्थ्यांना माहितीचा महासागर सहजगत्या उपलब्ध होत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी परिणामकारक अध्ययन-अध्यापन पद्धती अवलंबिण्याची गरज आहे. यासाठी विविध कार्यनीतीचा वापर शिक्षकांकडून होणे अपेक्षित आहे. शालेय अभ्यासक्रमातील विषयनिहाय विशिष्ट अथवा क्लिष्ट संकल्पना विद्यार्थ्यांपर्यंत अचूकपणे पोहोचविण्यासाठी शिक्षकांनी विविध तंत्रे व कौशल्याचे ज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे.

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० तसेच पायाभूत साक्षरता आणि संख्याज्ञान यांच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या दृष्टिकोनातून आपल्या शाळांमध्ये अनेकविध उपक्रमांना प्रारंभ झालेला आहे. 'शाळा एक समूह' म्हणून शालेय स्तरावर विविध उपक्रम राबवीत असताना अनेक आव्हानांना सकारात्मकतेने सामोरे जाऊन शालेय गुणवत्तावाढीसाठी प्रयत्न केले जात आहेत. हे कार्य निश्चितच प्रेरणादायी व कौतुकास्पद ठरत आहे.

गुणवत्तावाढीबरोबरच सुजाण नागरिकत्वाप्रत जाण्यासाठी नावीन्यपूर्ण विचारधारा आणि उपक्रमांचा स्वीकार करून आपण सृजनशील दिशेने वाटचाल करीत आहोत. अशाच उपक्रमांवर आधारित 'सृजनरंग' या ई-अंकाचे आपण नक्कीच स्वागत कराल, अशी खात्री बाळगतो.



**एम. देवेंदर सिंह (भा.प्र.से.)**
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## अनुक्रमणिका


◈ गुणवत्तेची चालू या वाट... १

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केऱ्हाळा, जि. औरंगाबाद

◈ समग्र विकासाकडे... ४

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय शाळा कोटबेल, जि. नाशिक

◈ उपक्रमाची चालता वाट ७

जि. प. उच्च प्राथमिक शाळा गोंधळी, जि. यवतमाळ

◈ संताचिया वाटे १०

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जि. प. उच्च प्राथमिक शाळा, चिंचाळा, जि. चंद्रपूर

◈ वाट गुणवत्तेची १४

जि. प. आदर्श प्राथमिक शाळा महाळुंगे, जि. सोलापूर

◈ प्रभावी शिक्षण वाट १८

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेल्हे बु., जि. पुणे

◈ मातृभाषा शिक्षणातून साधले गुणवत्तेची वाट २४

धानोरे, जि. पुणे

◈ उपक्रमातून आनंददायी शिक्षण २७

केंद्रशाळा उभादांडा नं. १, जि. सिंधुदुर्ग

◈ समस्येवर करूया मात २९

जिल्हा परिषद शाळा माळीवाडा, जि. परभणी

◈ आदर्शाच्या दिशेने ३२

जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा, दिघंची, जि. सांगली

# गुणवत्तेची चालू या वाट...

महाराष्ट्र शासनाने दिनांक ५ मार्च २०२१ च्या निर्णयाद्वारे ४८८ शाळा 'आदर्श शाळा' म्हणून घोषित केलेल्या आहेत. त्यामधील एक जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केऱ्हाळा ही आहे.

आम्हांला सदैव मार्गदर्शन करणारे मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. निलेश गटणे साहेब, श्री. मंगेश गोंदावले साहेब, श्री. सुरजप्रसाद जयस्वाल साहेब, शिक्षणाधिकारी मधुकरराव देशमुख, डायट चे प्राचार्य शेख सर, तालुका संपर्क अधिकारी प्रकाश मांटे सर तसेच शाळेला वेळोवेळी भेट देऊन आमचा उत्साह वाढविणारे गटशिक्षणाधिकारी व्यंकटराव कोमटवार, श्री. दिलीप शिरसाट साहेब व श्री. राजू फुसे साहेब, केंद्रप्रमुख श्री. शामराव फुसे साहेब, मुख्याध्यापक श्री. रामचंद्र मोरे सर व शालेय समितीचे अध्यक्ष शेख नाजीम यांच्या सहकार्याने आमची शाळा ही आदर्श शाळा म्हणून नावारूपास आली आहे.

सुंदर नावीन्यपूर्ण उपक्रमांनी नटलेली **'आदर्श शाळा केऱ्हाळा'** येथे इयत्ता पहिली ते सातवी मराठी व इयत्ता पहिली ते आठवी उर्दू माध्यमाचे एकूण ७४० विद्यार्थी शिक्षण घेतात.




शाळेची सुंदर अशी इमारत आहे. सर्वांच्या सहकार्याने शाळेभोवती उत्कृष्ट वृक्षवल्ली आहे. या वातावरणात आमचे सर्व विद्यार्थी आनंदी असतात. निसर्ग आमचा मित्र या उक्तीप्रमाणे सर्वजण शाळेतील झाडांची काळजी घेतात.

शाळेच्या बोलक्या व चित्रमय भिंती विद्यार्थ्यांचे लक्ष वेधून घेतात. शाळेसाठी स्वच्छ व सुंदर परिसर आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर योग्य ती काळजी घेऊन शैक्षणिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

**गुणवत्तापूरक उपक्रम :**

'अक्षर माझे सुंदर' हा उपक्रम संपूर्ण शाळा स्तरावर राबविला जातो. मराठी, इंग्रजी विषयासाठी उपक्रम राबविला जातो. काही दिवसातच विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक बदल दिसून आला आहे.



गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त आमच्या शाळेत २२ डिसेंबरला 'राष्ट्रीय गणित दिवस' साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी गणितीय रांगोळी स्पर्धा आणि उर्दू माध्यमासाठी गणित साहित्य प्रदर्शन आणि दोन्ही माध्यमातील विद्यार्थ्यांचे प्रश्नमंजुषा असे उपक्रम घेण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेचे सुंदर प्रदर्शन केले.

तसेच 'जिजाऊ ते सावित्री – सन्मान महाराष्ट्राच्या लेकींचा' या अभियानांतर्गत विविध उपक्रमांचे (भाषण स्पर्धा, वेशभूषा, निबंध स्पर्धा, आरोग्य तपासणी) तसेच विद्यार्थिनींसाठी उद्‌बोधन वर्ग, आनंद नगरी, महिलांचा सन्मान) तसेच शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

मुलांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी व स्वअभिव्यक्तीसाठी वक्तृत्व स्पर्धा, स्वरचित कविता-गायन यांचे आयोजन केले जाते. अवांतर वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी ग्रंथालयातील पुस्तके वाचण्यासाठी उपलब्ध करून दिले जातात.

**सहशालेय उपक्रम :**

शाळा स्तरावर विद्यार्थी अनुपस्थितीचे प्रमाण कमी करण्यासाठी नियमित शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांचे बक्षीस वाटप, प्रोत्साहन म्हणून कौतुक सोहळा केला जाते. विद्यार्थ्यांचे सामान्य ज्ञान वृद्धिंगत व्हावे यासाठी शाळेत प्रश्नमंजुषा उपक्रम घेतला जातो.



निबंध लेखन, चित्रकला, वक्तृत्व स्पर्धा, शुद्धलेखन स्पर्धा, विज्ञान प्रदर्शनासाठी प्रतिकृती

तयार करणे उपक्रम, स्पर्धा यांचे आयोजन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपक्रमांचे आयोजन केले जाते. विविध कृती, उपक्रमांतून विद्यार्थी आनंद मिळवितात. स्वत:मधील विविध कौशल्ये विकसित करतात.

अशा रितीने सर्वांच्या कल्पक विचारांनी विद्यार्थ्यांचा कृतियुक्त सहभाग व प्रसन्न वातावरणात शाळेत अध्यापनाचे कार्य चालते.

**शालेय संघटन :**

शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर. एन. मोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक कर्तव्य व्यवस्थित पार पाडतात. शाळेतील सहकार्य, संघटन, शिस्त वाखाणण्याजोगी आहे. प्रत्येकजण विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्न करीत आहेत.



विद्यार्थी विकासाबरोबरच शिक्षकांचे व्यावसायिक ज्ञान वृद्धिंगत करण्यासाठी प्रत्येक विषयाला अनुसरून मार्गदर्शन, प्रशिक्षणाचे आयोजन केले जाते.

शिक्षकांना येणाऱ्या अडचणींचे निरसन त्या त्या विषयाच्या तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून केले जाते.

शाळा हे संस्कार केंद्र आहे. शाळा ही सत्य शिकविणारी, समता शिकविणारी, सन्मानाने जगणे शिकविणारी, बालमनाची कळी प्रेमाने फुलविणारी सुंदर आणि आदर्श शाळा आहे.

अशा या जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केऱ्हाळा या शाळेतील विद्यार्थी स्वयं विकासाबरोबरच राष्ट्रोन्नतीलाही हातभार लावतील असा आमचा विश्वास आहे.

**जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा केऱ्हाळा,**
**ता. सिल्लोड, जि. औरंगाबाद**

◈ ◈ ◈

# समग्र विकासाकडे...

ईशान्येकडे पोखऱ्या, आग्नेयस वाघर्या, दक्षिणेस निचावळ्या व पश्चिमेस बिसट्याचा डोंगरच्या कुशीत ३५०० लोकसंख्या असलेले कोटबेल हे बागलाण तालुक्यातील एक गाव.

या गावात मराठा, धनगर, आदिवासी भिल्ल, बौद्ध, मातंग समाजाचे लोक राहतात. शेती, मेंढीपालन, 'पशुपालन' मजुरी यांसारखे व्यवसाय लोक करतात. ऊस तोडीसाठी काही मजूर स्थलांतर करतात. कांदे, भाजीपाला, डाळिंबाची शेती केली जाते.

विद्यार्थी पालकांबरोबर स्थलांतरित होत असतात, त्यामुळे शंभर टक्के उपस्थिती ठेवणे जिकिरीचे असते. शिक्षकांच्या अथक प्रयत्नामुळे यश येऊ लागले आहे. गावात शिक्षणासाठी जिल्हा परिषदेची पहिली ते सातवी पर्यंतची शाळा मराठा विद्या प्रसारक समाजाची जनता विद्यालय हे आठवी ते दहावीचे वर्ग असलेली माध्यमिक विद्यालय आहे. पुढील शिक्षणासाठी मात्र नामपूर, सटाणा, नाशिक असा पर्यायांचा विचार करावा लागतो.

जि. प. शाळा कोटवेल येथे सरासरी ४०० च्यावर पट असतो. शिक्षक आपले कौशल्य वापरून शालेय विद्यार्थ्यांची प्रगती कशी होईल यासाठी प्रयत्नशील असतात. सन २०१७ मध्ये येथील शालेय इमारतीचे निर्लेखन करून जि. प. चे तत्कालीन शिक्षण सभापती यतीनदादा पगार यांनी या शाळेसाठी पाच वर्गखोल्या मंजूर केल्या. आणखी वर्गखोल्यांसाठी बोरटेंभे येथे फाऊंडेशनकडे तत्कालीन शिक्षण अधिकारी वीर मॅडम यांच्या सहकार्याने इमारत बांधकामचा प्रस्ताव सादर केला. दरम्यानच्या कालखंडात एम्पथीने बांधकाम केलेल्या इमारती बघून आलो. यात बोरटेंभे, भोयेगाव, सोज्वळ येथील इमारती बघून आम्ही भारावलो आणि अशी इमारत आपल्यालाही आपल्या शाळेसाठी होऊ शकेल का? त्यासाठी चिंतन सुरू झाले, प्रयत्न सुरू झाले.

गावातील ग्रामस्थ, शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, शिक्षक यांच्याशी चर्चा सुरू झाली. त्यासाठी प्रयत्न सुरू झाले. मध्ये बराच कालखंड लोटला गेला. फाऊंडेशन इतकी मोठी इमारत बांधू शकते यावर कोणाचाच विश्वास बसत नव्हता. सुरुवातीच्या प्रयत्नानंतर इमारत बांधकाम होणार नाही असे वाटू लागले. ९५ टक्के गावातील व्यक्तींना याचा विश्वास नव्हता. परंतु अथक प्रयत्न चालू होते. प्रयत्न म्हणून गावातील साहेबराव पगार (पोलीस पाटील), आबासाहेब शिंदे, (शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष), भाऊसाहेब कांदळकर, वसंत सोनवणे सर इत्यादी. कोरोनाच्या कालखंडात आम्ही मुंबई गाठली. सदर मिटिंगमध्ये शाळेची परिस्थिती, गावाची एकंदरीत परिस्थिती, याची योग्य मांडणी करण्यात आली. त्या प्रयत्नाला आम्हांला यश आले. त्याच्यातून मोठा आत्मविश्वास निर्माण झाला. मुंबईवरून परत आल्यावर पुन्हा एकदा जोमाने कामाला लागलो. एम्पथीने आमचा प्रस्ताव मंजूर केला. १८ डिसेंबर २०२१ ला मोठ्या दिमाखदार सोहळ्याने इमारतीचा लोकार्पण सोहळा पार पडला. आज सारे विद्यार्थी इमारतीचा लाभ घेत आहेत. दहा वर्गखोल्या एक कार्यालय, मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे, दिव्यांगासाठी स्वच्छतागृह बघून केलेल्या धावपळ सार्थकी लागली याचे मनोमन समाधान वाटले.

वाबळेवाडीची यशोगाथा ऐकून होतो, भोयेगाव येथील शाळा बघून आपली शाळा अशी दर्जेदार होऊ शकेल काय? असा प्रश्न मला पडायचा. भोयेगाव येथील विविध शैक्षणिक उपक्रम बघून आपणही काहीतरी करावे या विचारात होतो. आय.एस.ओ. मानांकनाकरिता शाळा रंगविलेली होती. वेगळे अजून काही करता येईल का? याचाही विचार चालू होता. यातच रामनगर कळवणहून बदलून आलेले सोनवणे सर यांनी महाराष्ट्र राज्य आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या अभ्यासक्रमाची सकारात्मक बाजू शिक्षकांसमोर मांडली, सर्व शिक्षकांनी आंतरराष्ट्रीय शिक्षण मंडळाचा अभ्यासक्रम राबविण्याचा निर्णय घेतला, वरिष्ठ कार्यालयाकडून तात्काळ मंजुरी मिळाली. आता निश्चितच आमच्या पंखात बळ भरले गेले होते. फक्त इमारती अभावी कुठेतरी नाराजी दिसत होती. आमच्या जि. प. शाळेस भारतरत्न अटलबिहारी आंतरराष्ट्रीय शाळा कोटबेल असे नामकरण पाहून अभिमानाने आमची छाती उंचावली. आज आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमात बदल होऊन आमच्या शाळेची मॉडेल स्कूल म्हणून पुन्हा एकदा निवड झाल्याने आम्हांस खूप आनंद झाला आहे.

आजही आमचे सारे शिक्षक सहकारी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी झटत असतात. विविध सहशालेय उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचा सातत्याने प्रयत्न केला जातो आहे.

१) ऑनलाईन अध्यापन : विविध पीपीटीच्या माध्यमातून अध्ययन–अध्यापन केले जाते.

२) विज्ञान जत्रा : विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची गोडी लागावी यासाठी छोटे–छोटे विज्ञानाचे प्रयोगातून विविध खेळणी तयार करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते.

३) गणित जत्रा : या उपक्रमातून विद्यार्थ्यांना गणिताविषयी भीती दूर व्हावी यासाठी प्रोत्साहित केले जाते विविध गणिताचे उपक्रम या ठिकाणी मांडले जातात.

४) इंग्रजी जत्रा : इंग्रजी जत्रेचे आयोजन केले जाते.

५) आठवडे बाजार : विद्यार्थ्यांना खऱ्या अर्थाने व्यवहाराचे ज्ञान व्हावे या उद्देशाने आठवडे बाजार भरविला जातो. त्याच्यातून खरेदी–विक्री, नफा–तोटा यांसारख्या गोष्टींचा प्रत्यक्ष अनुभव देण्याचा प्रयत्न केला जातो.

६) पाहूणा आपल्या भेटीला : या ऑनलाईन उपक्रमातून समाजातील यशस्वी व्यक्ती तज्ज्ञ शिक्षक वर्ग यांचे मार्गदर्शन सत्र आयोजित केला जातो. त्याच्यातून शिक्षक, पालक, विद्यार्थी यांचे वैचारिक उद्बोधन होते.

७) कौन बनेगा ज्ञानपती : या उपक्रमातून विद्यार्थ्यांची ज्ञानलालसा वाढावी या उद्देशाने दर शनिवारी 'कौन बनेगा करोडपती' या धर्तीवर हा एक उपक्रम घेतला जातो.

८) सा रे ग म प कला मंच : विद्यार्थ्यांना संगीताची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने कविता, बडबड गीते, देशभक्तीपर गीते, समूह गीते यांना योग्य चाली लावून शालेय गीत मंच स्थापन करून विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

९) संगीतमय परिपाठ : दिवसाची सुरुवात ही चांगली व्हावी. विद्यार्थी आनंदित व्हावे यासाठी संगीताची साथ घेऊन परिपाठ करण्याचा प्रयत्न केला जातो.

१०) चला खेळूया पारंपारिक खेळ : सध्या विद्यार्थी खेळापासून दूर जात आहे. त्याला पारंपारिक खेळाची आवड निर्माण व्हावी, लगोरी, लंगडी, चिला पाटी, दोरी उड्या, विटी–दांडू, आवाज कमी यांसारख्या खेळातून विद्यार्थ्यांचा शारीरिक आणि मानसिक विकास करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले जाते.

११) विद्यार्थी ग्राहक भांडार : याच्यातून खरेदी–विक्री, नफा–तोटा यांसारख्या गोष्टींची संकल्पना समजावी यासाठी विद्यार्थी ग्राहक भांडाराची स्थापना करण्यात आलेले आहे.

१२) बँक ऑफ कोटबेल स्कूल : विद्यार्थ्यांना समाजासाठी बचतीची सवय व्हावी या उद्देशाने 'बँक ऑफ कोटबेल'ची स्थापना करण्यात आलेली आहे

१३) माझे झाड माझा वाढदिवस : विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जाणीव जागृती व्हावी, वृक्षांवर प्रेम करावे, वृक्षाचे आणि आपले काही नाते आहे याची जाणीव जागृती व्हावी या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येतो.

१४) पक्षी चित्र प्रदर्शन : पक्ष्यांविषयी प्रेम निर्माण व्हावे ते वाचावेत. पक्ष्यांना हानी पोहोचू नये या पार्श्वभूमीवरती पक्षी चित्र प्रदर्शन आणि त्यांचे रेखाटन हे विद्यार्थ्यांकडून करून घेतले जाते.

१५) गलोल स्पर्धा : आदिवासी विद्यार्थ्यांमध्ये नेमबाजी हा उपजत गुण असतो. त्या उपजत गुणाला प्रोत्साहन मिळण्यासाठी ही स्पर्धा घेतली जाते. त्यांच्या गुणाचे कौतुक करण्यात येते.

१६) ग्लोबल महाराष्ट्र उपक्रमात सहभाग : स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यासाठी जर्मनीतील महाराष्ट्र मंडळाशी संपर्क साधून विद्यार्थ्यांमध्ये एक आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

१७) संगणक शाळा : इयत्ता पाचवी ते सातवीच्या विद्यार्थ्यांना संगणकाची ओळख व्हावी. संगणकाचे महत्त्व समजणे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आलेला आहे.

विविध उपक्रम राबवून शाळेतल्या विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त कृतिप्रवण ठेवण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. त्याच्यासाठी गावाचे पालकसह इतर सर्वांचे सहकार्य चांगल्या पद्धतीने मिळत आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक प्रगतीसाठी जे काही चांगले करता येईल त्याच्यासाठी या शाळेतील सर्व शिक्षक हे प्रयत्नशील आहेत.


श्रीम. कल्पना मोरे, (मुख्याध्यापिका)
भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी
आंतरराष्ट्रीय शाळा कोटबेल, जि. नाशिक

# उपक्रमाची चालता वाट

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास म्हणजे शिक्षण होय. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी यापूर्वी अनेक पाठ्यक्रम तसेच त्यावर आधारित अनेक उपक्रम विविध स्तरावर राबविलेले आहेत. शासनाने संपूर्ण महाराष्ट्रभर आदर्श शाळा निर्माण करण्याचे ठरविले आहे. त्यावर उत्कृष्टपणे कार्यवाही सुरू आहे.

यवतमाळ जिल्हा हा आदिवासी बहुल जिल्हा आहे. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असल्यामुळे पालक आपल्या मुलाना चांगल्या सुविधांयुक्त शाळेत मुलांना पाठवू शकत नाहीत. या आदर्श शाळा निर्मितीकडे या जिल्ह्यातील बाभूळगाव तालुक्यातील जि. प. उच्च प्राथमिक शाळा, गोंधळी या शाळेची आदर्श शाळा म्हणून निश्चिती करण्यात आली. साहजिकच शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती विभा मधुकर गोडे, इतर सर्व शिक्षकांना मनोमन आनंद झाला. शैक्षणिक सत्र २०२१-२२ मध्ये आदर्श शाळांचा इयत्ता पहिलीचा पाठ्यक्रम राबविण्यास सुरुवात झाली. त्या अनुषंगाने शिक्षकांना प्रशिक्षण देण्यात आले. शिक्षकांच्या व्यावसायिक विकासासाठी प्रशिक्षण घेतले गेले.

### पुस्तक संच :

सत्राच्या सुरुवातीला सर्व विद्यार्थ्यांच्या घरोघरी पुस्तकांचे वाटप करण्यात आले. नवीन पुस्तकांचा संच पाहून विद्यार्थ्यांना मनोमन आनंद झाला.

### अध्ययन-अध्यापन स्थिती

राज्यात कोवीड परिस्थितीमुळे दोन वर्ष शाळा बंद होत्या. अध्ययन हे जसे होणे अपेक्षित होते, त्या प्रकारे झाले नाही. मुलांच्या अध्ययनावर मोबाईल शिक्षणामुळे अडथळे निर्माण होत होते. याही परिस्थितीत या सत्रामध्ये पहिलीचे अध्यापन सुरू केले.

मुलांच्या घरी जाऊन अध्यापन करणे कठीण होते. तरीपण घरोघरी जाऊन मंदिर/पटांगणात अध्यापन करणे सुरू केले. विविध उपक्रमांच्या माध्यमातून अध्ययन-अध्यापन सुरू होते.



### परिसर अभ्यास/पूरक उपक्रम :

मुले ही अजाण असतात. कोणत्याही गोष्टीकडे, वस्तूंकडे ते कुतुहलाने पाहतात. कोरोना काळात घरी जाऊन विद्यार्थ्यांना बोलके करणे महत्त्वाचे होते. त्यामुळे त्यांच्याकडे जाऊन, मुलांची विचारपूस करीत.

जसे : तुझे नाव काय? बाबा कुठे गेले? आई कोणते काम करते? बाजूचे घर कोणाचे आहे?

अशा प्रश्नांतून त्यांना घराची, परिसराची किती जाणीव/माहिती आहे ते कळत असे. तो त्याचे नाव सांगत असे. बाबा दूध विकायला गेले असे सांगत असे. त्यावरून त्यांच्या घरी गाई व म्हशी आहेत, हे आम्हांला कळत असे. बाबा खाऊ आणतात. आजी चारा आणते. आजोबा गोठा झाडतात. अशा विविध कामाची जाणीव जागृती मुलांना झाली आहे. शेजाऱ्यांचे नाव सांगितल्यावर त्यांच्या घरी कोंबड्या आहेत असे तो सांगतो. ५ कोंबड्या आहेत असेही तो सांगतो. कोंबड्या दाणे खातात, पाणी पितात, टोपलीखाली राहतात यातून त्याला पक्ष्यांना अन्न, पाणी व निवारा लागतो याची जाणीव होते. स्वतःविषयी माहिती विचारली की, मुले स्वतःचा दिनक्रम सांगतात. सकाळी उठतो, दात घासतो, आंघोळ करतो, जेवण करतो, खेळतो, गायीला पाणी पाजतो असा दिनक्रम तो सांगण्याचा प्रयत्न करतो.

**भाषाशिक्षण उपक्रम :**

मुले परिसरातून शिकत असतात. भाषेतून आपल्या भावना, विचार, गरजा व्यक्त करता येतात. आपली मातृभाषेत मुले बोलतात. इतरही भाषेचा परिणाम त्यांच्यावर होतो. मराठी बोलताना काही इंग्रजी शब्दांचे उच्चार करतात. जसे : बस, रेल्वे, रोड, पेन, बुक इत्यादी. कोरोना परिस्थितीमुळे ४ ते ५ विद्यार्थ्यांचा गट करून अध्यापन करीत असताना भाषा शिकविण्यासाठी मराठी व इंग्रजीतून एकत्र सराव करण्याचा प्रयत्न केला. त्या ठिकाणी असलेली वस्तू मराठी व इंग्रजीतून म्हणण्याचा सराव देणे सुरू केले.

जसे : चटई – Mat (मॅट) झाड – Tree (ट्री) नळ – Tap (टॅप)
फळा – Board (बोर्ड) कुलूप – Lock (लॉक)

त्यामुळे मुले पण मराठी व इंग्रजीतून शब्दोच्चार करू लागली. आनंदाने ते शब्द उच्चारतात. मराठीतील व इंग्रजीतील नावे सांगतात. पुढे अक्षर अवयवातून मराठीत व इंग्रजीत मुळाक्षरे वाचन, लेखन सराव सुरू केला. मराठीतील शब्द पटलावर अक्षरांची ओळख करून दिल्यामुळे मुलांना फार काळ लक्षात राहिले. जसे : कमळ, कचरा इत्यादी. यातूनच क व भ इत्यादी अक्षरांचे लेखन करणे सोपे गेले.

**गणिती भाषा संबोध :**

मुलांना घरातूनच गणिताचे संबोध माहिती असतात.

जसे : माझे घर शाळेजवळ आहे. दिनेशचे घर दूर आहे.
बाहेर दगड आहे. आतमध्ये साहित्य आहे.

अशा प्रकारे जवळ – दूर, आत–बाहेरचा संबोध मुलांना येतो.

यातून अंकओळख सोपी गेली.

माझ्या घरी १ गाय आहे. तुषारकडे ५ बकऱ्या आहेत.
मीनलकडे ४ कोंबड्या आहेत. पारसकडे काहीच नाही. (०)

या अभ्यासातून ० ते ५ ची ओळख मुलांना अतिशय मनोरंजकपणे करून दिल्यामुळे त्यांच्या चिरकाल लक्षात राहिले व हळूहळू अंक लेखन करून ते भरभर लिहू लागले.

**स्वकल्पनेतून शाळा स्तरावर राबविलेले उपक्रम :**

१) **सुंदर माझा खराटा :** या उपक्रमांतर्गत शाळेतील सर्व मुलांना सुंदर असा खराटा तयार करण्यास सांगून जो सुंदर व मजबूत अशा बांधणीचा खराटा तयार करेल अशा मुलांना बक्षीस देणे व प्रोत्साहित केले गेले.

२) **विना दप्तराची शाळा :** आठवड्यातून १ दिवस म्हणजे शनिवारी दप्तराशिवाय शाळा घेणे. त्या दिवशी मुलांना फक्त वेगवेगळे उपक्रम घेऊन त्यांची बालसभा घेऊन तो दिवस विनादप्तर साजरा केला जातो.

३) **कोण होईल ज्ञान सम्राट :** हा उपक्रम परिपाठ वेळी १५ मिनिटे घेऊन यातून विद्यार्थ्यांना सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न दिले जातात. तसेच शिष्यवृत्तीचे प्रश्न विचारण्यात येतात. अशा प्रकारे हा उपक्रम घेतला जातो.

४) **परिसरातील फुलांपासून रंग ओळख :** आपल्या सभोवताली अनेक फुले आहेत. त्या फुलांपासून कशा प्रकारे रंग तयार होतात याचे प्रात्यक्षिक देऊन मुलांना विविध रंगाची ओळख करून देणे, ते रंग त्यांना तयार करण्यास सांगितले जाते.



५) **उपस्थिती ध्वज :** ज्या वर्गाची उपस्थिती जास्त असेल त्या वर्गासमोर दिवसभर उपस्थिती ध्वज उभारून ठेवणे. अशा प्रकारे उपस्थिती ध्वज हा उपक्रम घेतला जातो. त्यामुळे मुलांमध्ये चढाओढ निर्माण होते. त्यांना आपापल्या वर्गाची उपस्थिती १००% रहावी असे वाटते. त्यासाठी सर्व मुले उपस्थित राहण्याचा प्रयत्न करतात.

जि. प. उच्च प्राथमिक शाळा गोंधळी,
पंचायत समिती बाभूळगाव, जि. यवतमाळ

◈◈◈

# संताचिया वाटे

आदिवासी बहुल चंद्रपूर जिल्ह्यातील एम.आय.डी.सी. क्षेत्रात वसलेले चिंचाळा हे गाव.

सन २०१५ पासून शाळेची पटसंख्या जेमतेम २०० च्या आत होती. शाळेमध्ये भौतिक सुविधांचा अभाव, चंद्रपूर शहर जवळ असल्याने पालकांचा पाल्यांना इंग्लिश माध्यमाच्या शाळांमध्ये टाकण्याचा दृष्टिकोन, त्यामुळे शाळेची पटसंख्या कमी झाली होती. याच वेळी ज्ञानरचनावादी अध्ययन–अध्यापन प्रक्रिया राबविल्यामुळे शाळेच्या गुणवत्तेत वाढ होत गेली. मुले बोलकी झाली. मूलभूत क्रियांमध्ये गती मिळत गेली. प्रगत ताडाळी बीटमधील चिंचाळा शाळा प्रसिद्धीस आली.

सन २०१८ मध्ये मा. नंदकुमार प्रधान सचिव शिक्षण यांच्या संकल्पनेतून महाराष्ट्र शासनाने 'महाराष्ट्र आंतरराष्ट्रीय' शिक्षण मंडळाची स्थापना केली. यासाठी राज्य स्तरावरून शाळा निवडीसाठी लिंक पाठविण्यात आली. त्यानुसार शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायत, सरपंच यांच्या प्रत्यक्ष मुलाखतींमधून पात्र झाली. चिंचाळा शाळेचा महाराष्ट्रातील १३ आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये समावेश करण्यात आला. ही चिंचाळा गावासाठी अतिशय अभिमानाची बाब ठरली. तेव्हापासूनच आमच्या शाळेला नवचैतन्याची उर्जा मिळाली. लोकांचा शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलू लागला. तेव्हापासूनच चिंचाळा शाळेची वाटचाल सर्जनशीलतेकडे सुरू झाली.

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीता अध्याय–१९ 'जीवन शिक्षण' यात सांगितले आहे की, मानवी जीवनातील प्रगती ही शिक्षण नितीचाच परिपाक असतो. त्यासाठी शाळा कशी असावी आणि तेथे कशा प्रकारे शिक्षण दिल्याने मुले आदर्श व सर्जनशील होतील हे खालील ओव्यांद्वारे स्पष्ट केले आहे.

याचसाठी शिक्षण घेणे । की जीवन जगता यावे सुंदरपणे ।<br>
दुबळेपण घेतले आंदणे । शिक्षण त्यासी म्हणो नये ।। ग्रामगीता<br>
पाठशाळा असावी सुंदर । त्यात मुले–मुली होतील साक्षर ।<br>
काम करावयासी तत्पर । शिकती जेथे प्रत्यक्ष । ग्रामगीता

ग्रामगीतेतील याच उद्दिष्टाने प्रेरित होऊन शाळेने आपले कार्य जोमाने सुरू केले. विदयार्थ्यांमध्ये एकविसाव्या शतकातील आव्हाने पेलणारी कौशल्ये विकसित करणे सुरू झाले. शाळेच्या गुणवत्तेचा वाढता आलेख पाहून पालकांचा कल या उपक्रमशील शाळेकडे वाढू लागला. विद्यार्थी पटसंख्या २५० च्यावर गेली. लोकसहभाग, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती आणि राज्य शासनाच्या मदतीने सध्याच्या शाळेतील भौतिक सुविधेच्या बाबतीतही वाढ होऊ लागली. मुला–मुलींसाठी स्वतंत्र शौचालय, क्रिडांगण सुविधा, प्रशस्त वाचनालय, अगस्त्या फाउंडेशनची प्रयोगशाळा आणि नावीन्यपूर्ण प्रयोगशाळा, संगणक कक्ष, आकर्षक बाला पेंटिंग, मनमोहक बाग, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, प्रत्येक वर्गामध्ये प्रोजेक्टर/स्मार्ट टीव्हीच्या साहाय्याने

दैनंदिन अध्यापन प्रक्रिया, ऑनलाईन शिक्षक निवड प्रकियाद्वारे उत्कृष्ट शिक्षकांची निवड व प्रशिक्षण या सर्व बाबींमुळे आज चिंचाळा शाळा पुढे जात आहे.

सन २०२० च्या इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परिक्षेत १३ पैकी १२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी ४ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक ठरले. तसेच सन २०२१ मध्ये घेण्यात आलेल्या नवोदय पात्रता परीक्षेत कुमारी तेजस्विनी प्रशांत लामगे आणि दुर्वेश विनोद ठावरी या दोन विद्यार्थ्यांची निवड झाली. यातील कुमारी तेजस्विनी प्रशांत लामगे ही विद्यार्थिनी चंद्रपूर जिल्ह्यामधून ग्रामीण सर्वसाधारण विभागातून प्रथम आली. ही बाब आमच्या शाळेतील २०२२ ला नवोदय परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरित करणारी ठरली. आम्हांला खात्री आहे की यावर्षी किमान १० विद्यार्थी नवोदयसाठी पात्र ठरतील.

**शाळेला सर्जनशीलतेकडे नेणारे विशेष उपक्रम :**

१) **आविष्कार उपक्रम :** एकतरी अंगी असू दे कला, नाही तर काय फुका जन्मला या वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या भजनानुसार विद्यार्थाच्या अंगी असणाऱ्या सुप्त गुणांना हेरून त्यांच्या आवडीचे शिक्षण मिळावे. यासाठी आविष्कार उपक्रम शाळेत सुरू करण्यात आला.

यात कराटे, नृत्य, वादन, गायन, स्पोकन इंग्लिश, चित्रकला, कोडिंग, कबड्डी, खो–खो, बॅडमिंटन, बुद्धिबळ यांचा समावेश करण्यात आला. प्रशिक्षक म्हणून गावातील तथा परिसरातील लोकांचे सहकार्य घेण्यात आले. हा उपक्रम अतिशय प्रभावी ठरला असून या माध्यमातून चंद्रपूर येथे आयोजित कराटे स्पर्धेमध्ये जिल्हा परिषद शाळेच्या इतिहासात ग्रामीण भागातील मुलांनी कराटे प्रशिक्षक श्री. राकेश सर यांच्या मार्गदर्शनातून प्रथमच सहभाग दर्शवित उल्लेखनीय कामगिरी केली.

जे.सी.आय चंद्रपूर तर्फे आयोजित नृत्य स्पर्धेमध्ये सुद्धा कॉन्व्हेंटच्या शाळांशी स्पर्धा करीत प्रथमच जिल्हा परिषद, चिंचाळा शाळेतील मुलींनी श्री. मयुर सर (कोरिओग्राफर) यांचे मार्गदर्शनातून आपल्या उत्तम नृत्याची झलक दाखविली आणि बक्षीस सुद्धा मिळविले. ही आमच्या आविष्कार उपक्रमाची फार मोठी उपलब्धी आहे.

श्री गुरूदेव सेवा मंडळ, चिंचाळाचे कार्यकर्ते श्री. तृप्तेश मासिरकर यांचे मार्गदर्शनातून तबला वादनाचे विशेष वर्ग सुरू आहेत. श्री. अनुप यादव सरांचे मार्गदर्शनाखाली विद्यार्थी कोडिंगचे ज्ञान घेत आहे. आउटडोअर व इनडोअर खेळासाठी शाळेतील शिक्षक अथक परिश्रम घेत असून त्यांना गावकरी खेळाडू तथा छत्रपती बहुउद्देशीय संस्था, चंद्रपूरचे सहकार्य मिळत आहे.

२) **मिशन स्पर्धा परीक्षा उपक्रम :** मुख्याध्यापक आणि शाळा व्यवस्थापन समिती यांचे पुढाकारातून इयत्ता पाचवीतील निवडक विद्यार्थ्यांसोबतच इयत्ता चौथीच्याही हुशार विद्यार्थ्यांना नवोदय शिष्यवृत्ती परीक्षेचे विशेष वर्गातून शाळेतील तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षकांचे सहकार्य घेण्यात येत आहे. प्रोजेक्टरच्या साहाय्याने दरवर्षी १००च्या वर सराव परीक्षा घेतल्या जातात.

इयत्ता पहिलीपासूनच मुलांची त्या वर्गानुसार स्पर्धात्मक परीक्षांची तयारी प्रत्येक वर्गशिक्षक करून घेत

आहेत. त्यामुळे आमच्या आदर्श शाळेचा शिष्यवृत्ती व नवोदय परीक्षेचा निकालसुद्धा चांगला लागत असून जिल्ह्यात एक आदर्श शाळा म्हणून नावलौकिकास येत आहे.

३) **एकात्मिक पथदर्शी उपक्रम :** शासनाचा नावीन्यपूर्ण उपक्रम म्हणून प्रकाश झोतात आलेला एकात्मिक पथदर्शी उपक्रम अतिशय चांगल्या पद्धतीने इयत्ता पहिलीसाठी राबविला जात आहे. ज्यामध्ये सर्व विषयांचा एकत्रित समवाय करून अभ्यासक्रमाची रचना केली आहे. विदयार्थ्यांना शिकण्यात खूपच आनंद होतो. संकल्पना आधारित अध्ययन–अध्यापन पद्धती असल्याने विद्यार्थी आनंददायी शिक्षण घेत असून त्याचे शिक्षण परिणामकारक होते.

४) **विषयमित्र/वर्गमित्र उपक्रम :** अध्ययनात मागे असलेल्या मुलांना प्रत्येक वर्गातून चार–पाच मुलांची निवड करून त्यांच्याद्वारे वाचन–लेखन तसेच गणितीय क्रियांची उजळणी होत आहे. यामुळे भाषा, गणित व इंग्लिश सोबतच इतर विषयाच्या प्रगतीमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.

५) **चंद्रपूर ऐतिहासिक वारसा चित्र प्रदर्शनी तथा राष्ट्रीय ऐतिहासिक वारसा चित्रकला स्पर्धा विशेष उपक्रम :** चिंचाळा येथील प्रसिद्ध चित्रकार श्री प्रविण कावेरी यांच्या चंद्रपूर ऐतिहासिक वारसा चित्रांची चित्र प्रदर्शनी २०१७ पासून चंद्रपूर येथे १५ ते १७ ऑगस्ट दरम्यान घेण्यात येत होती. या प्रदर्शनीचा फायदा चिंचाळा गावातील तथा शेजारील विद्यार्थ्याना व्हावा या उद्देशाने दिनांक १५ ते १७ ऑगस्ट–२०२१ ला ही प्रदर्शनी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चिंचाळा येथे घेण्यात आली. या प्रदर्शनीसोबतच शाळेतील मुलांसाठी राष्ट्रीय ऐतिहासिक वारसा चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. चंद्रपूर जिल्हा परिषद शाळांच्या इतिहासात पहिल्यांदाच १५ ऑगस्टला ही प्रदर्शनी व स्पर्धा घेण्यात आली. ही चिंचाळा शाळेसाठी फार मोठी अभिमानाची बाब आहे.

या चित्रकला स्पर्धेत चिंचाळा परिसरातील जिल्हा परिषद शाळेतील तथा खाजगी शाळेतील १०३ विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस अशी अतिशय उत्कृष्ट चित्रे काढून सहभाग नोंदविला. तीन दिवस चाललेल्या या प्रदर्शनीला प्राथमिक शिक्षणाधिकारी श्री. दिपेन्द्र लोखंडे, डायट प्राचार्य धनंजय चापले, चंद्रपूरचे डी.वाय.एस.पी. देशमुख साहेब, पडोली पी.एस.आय यादव साहेब, सेवानिवृत्त माहिती संचालक शरद चौधरी तसेच अनेक शिक्षकांनी तथा मान्यवरांनी या प्रदर्शनाला भेट देऊन श्री. प्रविण कावेरी आणि सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. विजेत्या स्पर्धकांना चंद्रपूर पंचायत समिती विकास अधिकारी आशुतोष सपकाळ यांच्या हस्ते प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

श्री. प्रविण कावेरी यांनी या प्रदर्शनात ठेवलेली अजरामर अशी चंद्रपूर ऐतिहासिक वारसा चित्रे चिंचाळा शाळेला भेट दिली. या चित्रांमुळे आमची शाळा जिल्ह्यामधील एकमेव अशी चंद्रपूर हेरिटेज म्युझियम बनली. चिंचाळा शाळेला भेट देणारे शिक्षक, विद्यार्थी, गावकरी यांच्यासाठी हे म्युझियम एक पर्वणीच व अभ्यासाचे केंद्र ठरले आहे. यापुढे दरवर्षी ही स्पर्धा १५ ऑगस्टला चिंचाळा शाळेत घेण्यात येणार आहे.

६) **शाळास्तरीय विज्ञान प्रदर्शन :** विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या वैज्ञानिक सर्जनशीलतेला संधी देण्यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन केले जात आहे.

७) **नवरत्न स्पर्धा उपक्रम :** मुलांच्या अंगी असणाऱ्या विविध गुणांना संधी देण्यासाठी वर्षभर नवरत्न स्पर्धेची तयारी केली जाते. यामुळे तालुकास्तर व जिल्हास्तरावर चिंचाळा शाळेतील विद्यार्थी प्रावीण्य प्राप्त करीत आहे.

८) **शाळा स्तर सांस्कृतिक व क्रीडामहोत्सव :** प्रत्येक वर्गाला त्यांच्यातील कला व क्रीडागुणांना चालना देण्यासाठी शाळास्तरावर सांस्कृतिक व क्रीडामहोत्सवाचे आयोजन २४, २५ आणि २६ जानेवारीला केले जाते. या माध्यमातून जास्तीत जास्त मुलांना प्रकट होण्याची संधी दिली जाते. यासाठी गावकऱ्यांचे सहकार्य लाभत आहे.

९) **शिक्षक सत्कार कार्यक्रम :** शाळा व्यवस्थापन समितीचे पुढाकारातून दरवर्षी ५ सप्टेंबरला शाळेतील सर्व शिक्षकांचा व त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून शिक्षक सत्कार कार्यक्रम आयोजित केला जातो. भेटवस्तू आणि प्रमाणपत्र देऊन सामुहिकरित्या गौरविण्यात येते. यामुळे शिक्षकांना प्रोत्साहन मिळते.

**लोकसहभागातून शाळा विकास :**

चिंचाळा शाळेची आंतरराष्ट्रीय शाळा म्हणून निवड झाल्यानंतर शाळेच्या भौतिक सुविधा व गुणवत्ता वाढीसाठी सर्वशिक्षक, गावकरी, अधिकारी व पदाधिकारी यांनी परिश्रम घेतले. शाळेला अनेक संस्था आणि मान्यवरांकडून आर्थिक स्वरूपात मदत प्राप्त झाली आहे. तसेच भौतिक व साहित्य स्वरूपात मदत मिळालेली आहे.

यामध्ये १) संगणक १० २) टॅब १० ३) नोटबुक व शैक्षणिक साहित्य ७०,००० रूपये ४) स्कुल बॅग १०० ५) पेवर ब्लॉक्स ४००० ६) विटा ४००० ७) वाळू ४ ट्रॅक्टर ८) फुलझाडे २०० ९) मॉनिटर ५ इत्यादी. ग्रामपंचायत नागाळा (सि.) कडून सन २०२० मध्ये ५ प्रोजेक्टर संच प्राप्त झाले. औद्योगिक परिसरातील मल्टी आर्ग्यानिक्स कंपनीकडून २ शौचालय बांधकाम, बोअरवेल आणि स्टेज बांधून देण्यात आले.

सरपंच रंजना कांबळे आणि शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रकाश शेंडे यांचे पुढाकारातून शाळेच्या मागणीनुसार यावर्षी पाच अँड्रॉईड टी.व्ही. संच भेट दिला जाणार आहे. शाळेला शासनाकडून मिळालेली अडीच एकर जागा ग्रामपंचायतच्या सहकार्याने जेसीबीद्वारे स्वच्छ करून देण्यात आली. याच जागेवर समग्र शिक्षा अभियानाद्वारे शाळेचे बांधकाम करण्याविषयी अंदाज पत्रकाद्वारे जिल्हा परिषदेकडे मागणी केलेली आहे.

**मान्यवरांचे शाळेच्या गुणवत्तेसाठी भेटी रूपाने योगदान :**

जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, चिंचाळा शाळेची गुणवत्ता वाढीसाठी अनेक मान्यवरांनी भेटी देऊन प्रोत्साहन दिले.

नामदेव आस्वले (मुख्याध्यापक)
भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय
जि. प. उच्च प्राथमिक शाळा, चिंचाळा
पंचायत समिती, चंद्रपूर, जिल्हा परिषद, चंद्रपूर

◈ ◈ ◈

# वाट गुणवत्तेची

*ही आवडते मजमनापासूनी शाळा*
*लाविते लळा ही जसा माऊली बाळा*





माझ्या शाळेच्या प्रवेशद्वारापाशी पाय ठेवताच या ओळी कुणालाही अगदी सहज आठवाव्यात आणि शाळा पाहताना प्रत्येक पावलावर पुन्हा पुन्हा आठवत राहाव्यात अशीच आहे. माझी शाळा – जिल्हा परिषद आदर्श प्राथमिक शाळा महाळुंगे. शाळेचे सुंदर आणि मनमोहक प्रवेशद्वार जणू शाळेत येण्यासाठी मुलांना खुणावत असते. हसून त्यांचे स्वागत करत असते. शाळेत आल्यावर मुलांना भेटते त्यांच्या नजरेला सुखावणारी शाळेतील हिरवाई. पुन्हा पुन्हा पहावीशी वाटणारी बागेतली वेगवेगळी फुले मुलांशी हितगुज करू पाहतात. शाळेत आलेल्या मुलांच्या मनात शाळेतली झाडे चैतन्य बनून रूजू लागतात, म्हणूनच माझ्या शाळेतली मुले दिवसभर फुलांसारखी टवटवीत अन् झाडांसारखी उल्हासित असतात. या बागेची निगा ही विद्यार्थीच राखतात. त्यामुळे विद्यार्थ्यांवर श्रमसंस्कार तर होतातच, शिवाय झाडांशी त्यांची मैत्री होते. हिरवाईचे महत्त्व त्यांच्या मनावर ठसते. अनेक औषधी वनस्पतीही या बागेत आहेत. त्यांची माहिती विद्यार्थ्यांना विनासायास होते.

सप्तरंगांच्या विविध छटांनी रंगलेल्या आणि असंख्य चित्रांनी सजलेल्या शाळेतील इमारतीच्या बोलक्या भिंती विद्यार्थ्यांशी रोज नव्याने बोलत असतात. त्यांना रोज नवे काही सांगत असतात. या भिंती विद्यार्थ्यांना सतत दंग ठेवतात. त्यांचे कुतूहल जागवितात आणि शमवितात देखील. शाळेच्या समोर असलेले स्वच्छ आणि प्रशस्त मैदान चिमुकल्यांना सांगत असते की, रोज माझ्याशी मैत्री करा, भविष्यात कधीही कुठल्याही रोगाशी तुम्हांला सामना करावा लागणार नाही. जिथे प्रकाशाचे साम्राज्य असते, तिथे अंधकाराचे अस्तित्व उरत नाही असे म्हणतात. अशीच माझी शाळा आहे.



विविध सुखसोयींनी, माझी शाळा सज्ज आहे. शाळेला पुरेशा सुस्थितीत खोल्या आहेत. स्वतंत्र मुख्याध्यापक कक्ष आहे. सर्व वर्गांच्या आतील भिंतीदेखील बोलक्या आणि आकर्षक रंगांनी नटलेल्या आहेत. मुलामुलींसाठी स्वतंत्र आणि पुरेशी स्वच्छतागृहे आहेत. विद्यार्थिनींना सॅनिटरी पॅड बदलण्यासाठी स्वतंत्र खोली आहे. पिण्याच्या पाण्यासाठी पुरेशा क्षमतेचा आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाने अद्ययावत असा आर. ओ. प्लॅन्ट शाळेत कार्यन्वित आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना नेहमीच स्वच्छ आणि ताजे पाणी पिण्यासाठी उपलब्ध असते. जेवणापूर्वी हात धुण्यासाठी शाळेत हँडवॉश स्टेशन उपलब्ध आहे. या सुविधा केवळ उपलब्ध आहेत असे नाही तर, या सुविधांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये चांगल्या सवयी कशा रुजतील याकडे शाळेतील सर्व शिक्षकांचे कटाक्षाने लक्ष असते. हँडवाश स्टेशनवर विद्यार्थी हात धुताना शास्त्रीय पद्धतीने हात धूत असतात. हात धुणे दिवस रोजच साजरा केला जातो. शाळेत मध्यान्ह भोजन योजना आहे. ते बनविण्यासाठी स्वतंत्र व स्वच्छ असे स्वयंपाकगृह उपलब्ध आहे.

ज्ञानाचा सागर म्हणजे शाळा. संस्कारांचा गोड झरा म्हणजे शाळा. व्यक्तिमत्त्व विकासाचे वेगळे वळण म्हणजे शाळा. मौजमस्तीचा वेगळा थाट म्हणजे शाळा. कोपऱ्यातील वेगळा प्रयोग म्हणजे शाळा. ग्रंथालय म्हणजे शाळा. रोजचा रंगीत फळा म्हणजे शाळा. टणटण वाजणारी घंटा म्हणजे शाळा. मैत्री आणि भांडणाची जोड म्हणजे शाळा. सकाळची प्रार्थना आणि मध्यान्ह भोजन म्हणजे शाळा.


अशा या माझ्या शाळेत अनेक विविध उपक्रम राबविले जातात.

**क्रीडा साहित्य कक्ष व साहित्याचे योग्य उपयोजन :**



क्रीडा साहित्य ठेवण्यासाठी शाळेत स्वतंत्र कक्ष आहे. या कक्षामध्ये क्रीडा साहित्याची मांडणी केलेली असते. विविध खेळांविषयी माहिती देणारे फलक या कक्षामध्ये लावण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना प्रेरक ठरणारी अनेक खेळाडूंची चित्रेही येथे लावण्यात आली आहेत. या कक्षात असणारे सर्व क्रीडा साहित्य नियमित व व्यवस्थितपणे वापरले जाईल याकडे शिक्षकांचे आवर्जून लक्ष असते.

**विज्ञान प्रयोगशाळा :**



विद्यार्थ्यांनी प्रयोगशील असावे, स्वत: विविध प्रयोग करून निष्कर्षापर्यंत पोहचावे, त्यांच्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रूजावा या उद्देशाने प्रेरीत असलेली आमच्या शाळेतील प्रयोगशाळा नेहमीच अद्ययावत व सुसज्ज असते. अगदी इयत्ता पहिलीपासूनचे विद्यार्थी प्रयोगशाळेशी नियमितपणे जोडले गेले आहेत.

### वाचन प्रेरणादायी वाचनालय :

विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला नवा आयाम देणारे, विद्यार्थ्यांना विचारप्रवण आणि कृतीप्रवण बनविणारी महत्त्वाची बाब म्हणजे वाचन. वाचनाचे हे महत्त्व लक्षात घेऊन शाळेत स्वतंत्र वाचनालय विकसित करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांचे, विद्यार्थ्यांनी आणि विद्यार्थ्यांसाठी चालविलेले वाचनालय असे या वाचनालयाचे स्वरूप आहे. शाळेतील सर्वांत मोठा वर्ग म्हणजे इयत्ता सातवीच्या विद्यार्थ्यांच्या हातात या वाचनालयाचे सारथ्य देण्यात आले आहे. वाचनालयात जवळजवळ सर्वच प्रकारचे बालसाहित्य उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी तयार केलेले वर्तमान पत्रातील विविध विषयांवरचे कात्रणसंग्रह हे या वाचनालयाचे मुख्य आकर्षण ठरले आहे.

### संरक्षक भिंत :

शाळेभोवती सात फूट उंचीची संरक्षक भिंत असून ती सुस्थितीत असल्याने शालेय परिसर स्वच्छ, नीटनेटका राहण्यास मदत होते. विद्यार्थी सुरक्षेच्या दृष्टीनेही संरक्षक भिंत महत्त्वाची ठरली आहे. शाळेत विविध सोयी–सुविधा उपलब्ध असल्याने पंचक्रोशीतील विद्यार्थी शाळेत प्रवेश घेण्यास उत्सुक असतात. त्यामुळे शाळेचा पट नेहमीच चांगला राहिला आहे.



### आपत्ती व्यवस्थापन :

आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून शाळेत अग्निशमन यंत्रणा उपलब्ध आहे.

### पर्यावरण पूरक उपक्रम :

कचऱ्याची विधायक विल्हेवाट लावून त्यापासून तयार झालेले खत शाळेतील झाडांसाठी वापरले जाते. गांडूळखत निर्मिती प्रकल्पही शाळेत कार्यान्वित आहे. याशिवाय शाळेत शाळेची विजेची गरज भागविणारा सौर ऊर्जा प्रकल्पदेखील आहे.

शाळेत स्वत: शिक्षकांनी तयार केलेले व शासनाने पुरविलेले शैक्षणिक साहित्य विपुल प्रमाणात आहे. त्यांचा विपुल वापरही शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून होत असतो. भाषा, गणित व इंग्रजी पेटीचा वापर करून विद्यार्थ्यांची भाषिक कौशल्ये, संख्याज्ञान व मूलभूत गणिती क्रियांचा विकास शाळेत वेगाने झालेला दिसून आला.

डिजिटल शिक्षणाचे महत्त्व किंवा अपरिहार्यता कोरोनामुळे झालेल्या टाळेबंदीने ठळकपणे अधोरेखित केली आहे. टाळेबंदीच्या आधीपासूनच शाळेत विविध ई–साधनांचा वापर अध्ययन–अध्यापनासाठी केला जात होता.



यामध्ये प्रोजेक्टर, स्मार्ट टी.व्ही, संगणक संच, मोबाईल्स, टॅब, ब्ल्यू टूथ, साऊंड्स इत्यादी ई–साधनांचा समावेश आहे. या सर्व साधनांचा वापर टाळेबंदीच्या आधी शाळेतील सर्वच शिक्षकांनी यथायोग्यपणे केला परंतु टाळेबंदीच्या काळात विद्यार्थ्यांपर्यंत पोहचण्यासाठी ज्या ज्या म्हणून गोष्टी होत्या त्यांचाही वापर शाळेतील शिक्षक बांधवांनी केला. सुरूवातीला पीडीएफ प्रिंट्स विद्यार्थ्यांपर्यंत पोहचविल्या. त्यानंतर मात्र यू–ट्यूब लिंक्स, टिलीमिली उपक्रम, व्हॉट्सअप ग्रुप, झूम मीटिंग, गुगल मीट, फेसबुक अशा माध्यमांचा उपयोग करत शिक्षण अखंड सुरू राहील, विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार नाही यासाठी सर्व शिक्षकांनी अभिमानास्पद प्रयत्न केले.




याशिवाय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी शाळा नेहमीच प्रयत्नशील असते. मूल्यसंवर्धनासाठी शाळा परिपाठापासून विविध राष्ट्रीय दिन साजरे करणे, महापुरूषांची जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, बालदिन, बालिका दिन, महिला दिन इत्यादी दिन साजरे करणे असे विविध उपक्रम घेत असते. याचबरोबर विविध प्रकारच्या स्पर्धा, खेळ, प्रश्नमंजुषा, गीतमंच, सांस्कृतिक कार्यक्रम, मुलांचे वाढदिवस, सण असे वैविध्यपूर्ण उपक्रम सातत्याने घेत असते. विशेष बाब म्हणजे शाळेतील दैनंदिन परिपाठ हा तिन्ही भाषांमध्ये घेतला जातो. दिनांक, तो पाढा, पाच मिनिटे स्वच्छतेची, समूहगान, बोधकथा, वाढदिवस, उपस्थिती ध्वज असे उपक्रम राबविले जातात. तसेच शिक्षक व विद्यार्थ्यांचे वाढदिवस शाळेस भेट देऊन राबविले जातात. शिक्षक त्यांच्या वाढदिवशी शाळेस एक पुस्तक व एक झाड भेट देतात.

अशा रितीने माझी शाळा म्हणजे माझे कुटुंब आहे. शिक्षक व विद्यार्थी हे माझ्या कुटुंबाचे सदस्य आहेत, म्हणूनच आमच्या कुटुंबातील प्रत्येक सदस्याला या ओळी नेहमीच सार्थ वाटतात.

*ही आवडते मजमनापासूनी शाळा, लाविते लळा ही जसा माऊली बाळा*

व्हिडीओ लिंक :

https://drive.google.com/file/d/1-Q803sj6P87sFUH1YPK2Wx7M9YšpZCM4/view?usp=drivesdk

श्रीम. शारदा लोखंडे (मुख्याध्यापिका)
जि.प. आदर्श प्राथमिक शाळा महाळुंगे,
ता. माळशिरस, जि. सोलापूर

# प्रभावी शिक्षण वाट

*ही सृष्टी विज्ञानाची, घेऊ दृष्टी विज्ञानाची.*
*या दृष्टीने दूर करूया भीती अज्ञानाची.*
*जडेल जेव्हा तुझिये, नाते आकाशाशी.*
*जात, धर्म, वंशाच्या भिंती जातील लयाशी.*
*माणुसकीच्या धर्माने जोडू माणूस माणसाशी.*
*तम साथ सोडूनिया, करू मैत्री प्रकाशाशी.*
*या प्रकाशाने पेटवूया, ज्योत ही ज्ञानाची.*
*ही सृष्टी विज्ञानाची, घेऊ दृष्टी विज्ञानाची.*

आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेल्हे बु. ही शाळा महाराष्ट्र राज्य शासनाने आदर्श शाळा म्हणून विकसित करण्यासाठी निवडली आहे. वेल्हे सारख्या दुर्गम तालुक्यातील सर्वांत मोठी, उपक्रमशील, प्रयोगशील शाळा म्हणून या शाळेची ओळख आहे. आमच्या शाळेत नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्रसुद्धा आहे. या विज्ञान केंद्राचा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयोग व्हावा म्हणून आमच्या शाळेत तोरणा फोर्ट विज्ञान क्लब स्थापन केला आहे. या क्लबची नोंदणी भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या विज्ञान प्रसार, दिल्ली या संस्थेत केली.

आमची शाळा ग्रामीण भागात असून अनेक रुढी, परंपरा, चालीरिती यांचा परिणाम मुलांच्या मनावर जाणवतो. निसर्गाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात सुद्धा याचा प्रभाव दिसून येतो. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मध्ये वर्णन केलेली एकविसाव्या शतकातील कौशल्ये त्यातील मार्गदर्शक तत्वांचा व आदर्श शाळेच्या निवडीचा विचार करता तसेच शाळेत उपलब्ध साधनांतून वेगळे उपक्रम घेण्याची इच्छा असल्याने शाळेतील सर्व शिक्षक या क्लबमार्फत विविध विषयांवर आधारित अनेक उपक्रम घेत आहोत. त्यापैकी काही उपक्रम खालील प्रमाणे आहेत.

### विज्ञान मास – २०२० :

फेब्रुवारी २०२० हा महिना आमच्या शाळेने विज्ञान मास म्हणून साजरा केला होता. ही परंपरा याही वर्षी चालू ठेवत फेब्रुवारी २०२१ हाही महिना विज्ञान मास म्हणून साजरा करण्यात आला. कोरोनाचा प्रार्दुभाव कमी झाल्यावर मुलांना छोट्या छोट्या समूहात विभागून समूह वर्ग अध्यापन सुरू केले होते. शाळेच्या आवारात/ गावातील मोकळ्या जागेत मुलांना नावीन्यपूर्ण विज्ञान क्लब मधील छोटे छोटे प्रयोग दाखविण्यात आले व त्यांच्याकडून ते करूनही घेण्यात आले.

**बालभारती - विशेष मार्गदर्शन सत्र :**

तोरणा फोर्ट विज्ञान क्लबच्या मागील वर्षाच्या व या वर्षाच्या कार्यामुळे आम्हांला राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त फार मोठी संधी प्राप्त झाली. बालभारतीने सन २०२१ मध्ये विशेष मार्गदर्शन सत्राचे ऑनलाईन आयोजन केले होते. या विशेष मार्गदर्शन सत्रात 'चंद्र व त्याच्या कला' या विषयावर मार्गदर्शन केले. यामध्ये कला घडण्याचे कारण, चंद्राची नेहमी दिसणारी एकच बाजू, चांद्रमास, अधिकमास अशा घटकांचा समावेश होता. हे सत्र ३ मार्च २०२१ रोजी बालभारतीच्या यू-ट्यूब चॅनेलवरून प्रक्षेपित करण्यात आले.

**विज्ञानातील गमती जमती ATM मस्ती की पाठशाला :**

कृतिशील शिक्षक महाराष्ट्र हा शिक्षकांचा राज्यस्तरीय समूह आहे जो विद्यार्थ्यांसाठी अनेक उपक्रम राबवित असतो. सन २०२१ च्या उन्हाळ्यात मुले घरात कोरोनाच्या लाटेत बंदिस्त असताना त्यांच्यासाठी सुरुवातीला दहा दिवसांचा ATM मस्ती की पाठशाला हा ऑनलाईन कार्यक्रम घेण्याचे आमच्या या समूहाने ठरविले. त्यात शेवटच्या दिवशी म्हणजे ५ जून २०२१ रोजी आमच्या क्लबने 'विज्ञानातील गमती जमती' हा पदार्थांच्या चमत्कारिक गुणाधर्मांवर आधारित कार्यक्रम घेतला गेला. या कार्यक्रमात मंत्राने अग्नी पेटविणे, रंग बदलणारी हळद, रुसलेला म्हणजे न फुगणारा, न फुटणारा फुगा, लिंबातून येणारे रक्त, साधी मोटार तयार करणे, दिशा बदलणारे, बाणभिंगाचे गुणधर्म जसे प्रकाश एकवटणे, चित्र उलटे होणे, मॅग्नेटिक लेविएशनमुळे फिरणारी पेन्सिल, बुलेट ट्रेनची कार्यप्रणाली असे प्रयोग दाखविण्यात आले. हा कार्यक्रम आतापर्यंत सुमारे १५००० विद्यार्थ्यांनी यू-ट्यूबवर व झुम मीटिंगच्या माध्यमातून ३००० विद्यार्थ्यांनी live पाहिला आहे.

**गृह ते ग्रह :**

**ATM मस्ती की पाठशाला - शाळा पूर्व तयारी भाग २ व उजळणी भाग ३** भागात इयत्ता सहावी ते आठवीसाठी गृह ते ग्रह हा virtual trip चा कार्यक्रम २६ जुलै २०२१ रोजी ऑनलाईन लाईव्ह घेण्यात आला. या कार्यक्रमात Google map च्या साहाय्याने मुलांना आपल्या घराचा परिसर म्हणजे गाव, रस्ते, नदी, डोंगर असे भूभाग तसेच नंतर त्यांच्या पाठ्यक्रमातील विविध ठिकाणे जसे तोरणा, राजगड, सिंहगड त्याच प्रकारे लोणार सरोवर, वेरूळची लेणी, कैलास मंदिर हे satellite view, 3D view, glob view च्या मदतीने आपण प्रत्यक्ष पाहत आहोत असे दाखविण्यात आले.

त्यांनतर त्यांना संपूर्ण पृथ्वीवरील विविध खंड, समुद्र दाखविले. चंद्रावरील खाचखळगे, क्रेटर, त्याची पृथ्वीवरून दिसणारी व कधीही न दिसणारी बाजू दाखवण्यात आली. त्यानंतर बुध, शुक्र व शेवटी मंगळ ग्रह मुलांनी पाहिले. मंगळावरील पृष्ठभाग, तेथील सर्वांत मोठा पर्वत मॉन्स ऑलंपस जो आपल्या माऊंट एव्हरेस्टपेक्षा तिप्पट उंच आहे तो मुलांनी पाहिला.

अशा प्रकारे घरापासून सुरू झालेला प्रवास ग्रहांपर्यंत जाऊन पोहचला. या कार्यक्रमातून गुगल मॅपच्या

विविध सेटिंग्सचा उपयोग कसा करायचा हे विद्यार्थी व शिक्षकांनी समजून घेतला. क्लबच्या या उपक्रमाचा राज्यातील हजारो मुलांना फायदा झाला.

**डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विज्ञान वाहिनीचे प्रयोग :**

शिक्षक दिनाच्या निमित्ताने भोर तालुक्यातील संत लिंगनाथ माध्यमिक विद्यालयातील विज्ञान शिक्षक श्री. देवराव कांबळे सरांनी स्वखर्चातून १०० प्रयोग असलेल्या डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विज्ञान वाहिनी – फिरती प्रयोगशाळा याचे उद्घाटन केले. या विज्ञान वाहिनीचा पहिला प्रयोग आमच्या शाळेतील तोरणा किल्ला विज्ञान क्लबने ११ सप्टेंबर २०२१ रोजी आयोजित केला.

श्री. कांबळे सरांनी सोप्या भाषेत मुलांना अनेक प्रयोग करून दाखविले. तसेच त्यातील वैज्ञानिक संकल्पना स्पष्ट केल्या. कविता, गाणी व पोवाडा यांच्या माध्यमातून कार्यक्रम मनोरंजक करण्यात आला. मुलांना प्रयोगाचे साहित्य वाटून ते प्रयोग करण्यास सांगितले.

**इनोव्हेशिया :**

पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. आयुष प्रसाद यांच्या संकल्पनेतून 'ग्राम सेतू' हा प्रकल्प शाळेत घेण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत आमच्या शाळेला पुणे जिल्ह्यातील कावेरी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या कलमाडी शामराव प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांची TWINNING केली आहे. शहरी व ग्रामीण शाळांचा एकत्रित विकास साधण्यासाठी हा ५ वर्षांचा प्रकल्प घेण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत कलमाडी शामराव प्राथमिक शाळेत घेण्यात येणारा 'इनोव्हेशिया' हा वैज्ञानिक कार्यक्रम दोन्ही शाळेतील शिक्षकांच्या साहाय्याने आता आमच्याही शाळेत ऑनलाईन पद्धतीने आयोजित करण्यात येत आहे. आतापर्यंत अनेक कार्यक्रम घेण्यात आले आहेत, पुढेही घेण्यात येणार आहेत. झुम च्या मदतीने शाळेतील मुले व शिक्षक स्मार्ट टी.व्ही.चा उपयोग करून कार्यक्रमास सहभागी होतात. या प्रकल्पात कार्यक्रम एरोडायनामिक्स, यिस्ट बनविणे, प्रकाश, आभासी पर्यटन, श्वसनाचे तंत्र, जलतरंगाचे विज्ञान, मास्क व घरगुती सॅनिटायझर बनविणे, इंटरनेट व भौतिक जग, जीवाश्म, साधी यंत्रे, घनपदार्थांचे घनत्व, भाषेची प्रयोगशाळा, जैविक नकला, वन उत्पादने, परिकथा यांविषयी कार्यक्रम घेतले आहेत. याची शेवट राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त विज्ञान प्रदर्शनाने होणार आहे.

**स्वरविज्ञान :**

ग्रामसेतू या प्रकल्पांतर्गत दि. २४ सप्टेंबर २०२१ रोजी कावेरी ग्रुप ऑफ स्कूल्सच्या वतीने स्वरविज्ञान हा संगीत व विज्ञान यांचा सहसंबंध साधणारा कार्यक्रम फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून दोन्ही शाळेत घेण्यात आला. या कार्यक्रमात वादक कलाकारांनी विविध वाद्य व त्यामागील विज्ञान उलगडून दाखविले. सुंदरी, ढोलकी व नाल, क्लॅरिनेट, घट्टम या वाद्यांचा उगम, रचना, स्वर रचना व स्वर निर्मितीमागे दडलेले विज्ञान

अशा अनेक वैज्ञानिक पैलूंना स्पर्श करत व ती वाद्ये वाजवून दाखवित हा कार्यक्रम रंगला. शेवटी या सर्व वाद्यांची जुगलबंदी सादर करण्यात आली. या कार्यक्रमातून आमच्या शाळेतील मुलांनी प्राचीन परंपरा, वाद्ये व संस्कृती यातही विज्ञान दडले आहे हे जाणून घेतले.

मिलाप– Michigan India Learning -ssociation Program

शाळेतील तोरणा फोर्ट विज्ञान क्लबचा मिलाप अमेरिकेतील यिप्सिलांटी, मिशिगन येथील श्री. योगेश चावरकर यांच्या Light Benders या क्लब सोबत झाला आहे. दोन्ही देशात विज्ञान व संस्कृतींच्या देवाण–घेवाणीसाठी हा कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमाची सुरुवात विज्ञानातील खगोलीय संकल्पनांवर आधारित The Light and Shadow game of Moon या विषयावरील  सेशनने झाली आहे. असे अनेक कार्यक्रम पुढे चालू राहणार आहेत.

यातील प्रमुख सत्र म्हणजे सूर्यग्रहण व चंद्रग्रहण, तारे – जन्म ते मृत्यू प्रवास, ब्लॅक होल, धृवांवरील प्रकाश (Northern Aurora), विविध तारकापुंज, राशी, ग्रहांचे मार्गक्रमण.

**राज्यातील शाळांमध्ये विपनेट विज्ञान क्लब स्थापना :**

तोरणा फोर्ट विज्ञान क्लबचे उपक्रम जेव्हा राज्यातील इतर शाळा व शिक्षकांपर्यंत पोहचू लागले तेव्हा त्यांच्याकडून या क्लबविषयी विचारणा होऊ लागली व त्यांच्याही शाळेत असा क्लब स्थापन करण्याची व उपक्रम घेण्याची इच्छा व्यक्त केली. यासाठी प्रत्येक शिक्षकास वेगळी माहिती देण्यापेक्षा इच्छुक शिक्षकांचा एक व्हॉट्सअप ग्रुप तयार करण्यात आला.

या ग्रुपमध्ये माहिती घेण्यासाठी सुमारे २०० शिक्षक सामील झाले. विपनेट विज्ञान क्लब स्थापने संदर्भात सगळी माहिती एका डॉक्युमेंटमध्ये लिहून त्यांना देण्यात आली. तरी अनेक प्रश्न उपस्थित होत होते म्हणून दिल्ली येथील भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या विज्ञान प्रसार या संस्थेचे राष्ट्रीय समन्वयक श्री. अरविंद रानडे सर (वैज्ञानिक) यांना ग्रुपबद्दल माहिती दिल्यानंतर त्यांनी शिक्षकांना दि. २६/०९/२०२१ रोजी एका झूम मीटींगद्वारे विज्ञान प्रसार संस्था, विपनेट तसेच विद्यार्थी विज्ञान मंथन परीक्षा याबद्दल सखोल मार्गदर्शन केले. त्यापासून प्रेरणा घेऊन अनेक शिक्षक आपल्या शाळेत क्लब स्थापन करण्यास तयार झाले. या समूहातील अनेक शिक्षकांनी त्यांच्या शाळेत क्लब स्थापन करण्याची तयारी दाखवून नोंदणी केली.

आपल्या राज्यात आधी असलेल्या २५० क्लबमध्ये या ५० क्लबची भर पडल्याने आता ही संख्या ३०० झाली आहे व त्यात एकदम २० % वाढ झाली असून ही संख्या अजून वाढणार आहे. आमच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेल्हे बु. मधील तोरणा फोर्ट विज्ञान क्लब पासून प्रेरणा घेऊन हे क्लब स्थापन झाल्याने आमच्या क्लबच्या कार्याचे हे यश म्हणावे लागेल.

या क्लबची माहिती या वेबपेजवर उपलब्ध आहे.

https://vigyanprasar.gov.in/vipnet-re-registered-clubs-/pre-club-detail/?id=Maharashtra

### क्लबच्या कामाची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल :

आमच्या शाळेतील तोरणा फोर्ट विज्ञान क्लबने केलेल्या कार्याचा समावेश जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली व इन्स्टिटयुट ऑफ सोशल स्टडीज, इरॅस्मस विद्यापीठ, रॉटरडम, नेदरलँड यांच्या संयुक्त विद्यमाने केलेल्या 'वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसारासाठी विज्ञान क्लबची भूमिका' या सर्वेक्षणात करण्यात आला आहे. यासाठी जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या डॉ. दीप ज्योती फ्रांसिस व डॉ. सरदिंदू भादुरी (असोसिएट प्रोफेसर) यांनी ऑनलाईन पद्धतीने शाळेतील विज्ञान क्लबच्या कार्याला जाणून घेतले. तसेच विज्ञान प्रसार या राष्ट्रीय संस्थेने जाहीर केलेल्या देशातील सर्वांत प्रशंसनीय कार्य करणारे क्लबच्या यादीत आमच्या क्लबचा समावेश आहे.



सकाळ

# वेल्हे शाळेचा आंतरराष्ट्रीय 'मिलाप'

## शैक्षणिक देवाणघेवाणीसाठी उपक्रम ; ग्रहणांच्या संकल्पनांबाबत मार्गदर्शन

**वेल्हे, ता. ६ :** अमेरिकेतील यप्सिलांटी, मिशिगन येथील लाइट बेंडर्स ॲस्ट्रॉनॉमी क्लब व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेल्हे बुद्रुकच्या तोरणा फोर्ट विज्ञान क्लबच्यावतीने 'मिलाप' हा आंतरराष्ट्रीय शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक देवाणघेवाण करणारा कार्यक्रम सुरु झाला आहे.

वेल्हे येथील शाळेसह राज्यातील अनेक शाळेत तो कायमस्वरूपी सुरू राहणार असल्याची माहिती फोर्ट क्लबचे संयोजक उमेश नेवसे यांनी दिली.

या कार्यक्रमांतर्गत 'द लाइट ॲण्ड शेड गेम ऑफ' हे चंद्राच्या कला, चंद्रग्रहण, सूर्यग्रहण, टायडल लॉकिंग, अशा संकल्पना स्पष्ट करणारे मार्गदर्शन सत्र नुकतेच घेण्यात आले. या सत्रात सुरुवातीला लाइट बेंडर्स

ॲस्ट्रॉनॉमी क्लबचे संयोजक योगेश चावरकर यांनी राज्यातील ११ शाळेत शेकडो मुलांना पाठ्यपुस्तकातील कठीण संकल्पना 'स्लाईड शो'च्या मदतीने सोप्या शब्दांत समजावून सांगितल्या. आनंद शारंगपाणी यांनी क्लबबद्दल माहिती देत प्रास्ताविक केले. सत्राच्या शेवटी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शंकाचे निरसन करण्यात आले. किरण कांबळे यांनी कार्यक्रमाच्या उपयोगितेबद्दल मत व्यक्त केले. शिक्षक नेताजी आरडे यांनी कार्यक्रमाचे तांत्रिक नियोजन केले.

कार्यक्रमाचे नियोजन योगेश चावरकर व तोरणा फोर्ट विज्ञान क्लबचे संयोजक उमेश नेवसे यांनी केले. या मिलाप कार्यक्रमांतर्गत यापुढे अवकाशीय, खगोलीय व दोन्ही देशांची सांस्कृतिक देवाणघेवाण या विषयांवर ऑनलाइन सत्र आयोजित करण्यात येणार आहे. माधुरी देशपांडे यांच्या प्रयत्नातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

**दृष्टिकोन निर्मितीचे कार्यक्रम**

वेल्हे शाळेतील तोरणा फोर्ट विज्ञान क्लब हा भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या दिल्ली येथील विज्ञान प्रसार या संस्थेत रजिस्टर्ड आहे. या क्लबच्या प्रेरणेने राज्यातील ५५ शाळेतही विज्ञान क्लब स्थापन झाले असून वैज्ञानिक दृष्टिकोन निर्मितीचे कार्यक्रम सुरू झाले आहेत.

**या ठिकाणी पाहा रेकॉर्डिंग**

या कार्यक्रमाचे रेकॉर्डिंग क्लबच्या lightbenders.net/events/milap या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा लाभ इतर शाळेतील मुलांना होत आहे.

Pune, District-Today
07/12/2021 Page No. 5



सकाळ

# वेल्हे शाळेच्या उपक्रमांची नेदरलँड, दिल्लीत नोंद

**वेल्हे, ता. ५ :** किल्ले तोरण्याच्या पायथ्याला असलेल्या पुणे जिल्ह्यातल्या दुर्गम अशा वेल्हे तालुक्यात असलेली जिल्हा परिषदेची सर्वात मोठी असलेली शाळा ही विकसित करण्यासाठी निवडली गेली आहे. या शाळेतील उपक्रमांची नोंद ही दिल्लीतील जवाहरलाल नेहरू विद्यापीठ व नेदरलँड येथील इरॅस्मस विद्यापीठाच्या इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्स विभागाने घेतली आहे. तसेच शाळेमध्ये असणाऱ्या तोरणा फोर्ट विज्ञान क्लब हा भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाच्या 'विपनेट' या संस्थेत नोंदणीकृत आहे.

या क्लबच्या माध्यमातून व शाळेतील नावीन्यपूर्ण विज्ञान केंद्राच्या साहाय्याने शाळेत विज्ञान व परिसर अभ्यासाचे नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जातात. तसेच या शाळेत विविध ॲपचा उपयोग करून सूर्यमाला दाखविणे, गुगल मॅपच्या साहाय्याने ग्रहांचा अभ्यास, चंद्र निरीक्षण कार्यक्रम, राशींची रचना यांचा समावेश आहे. हा क्लब दरवर्षी फेब्रुवारी महिना विज्ञान मास म्हणून साजरा करतो.

डॉ. दीप ज्योती फ्रान्सिस यांनी गुगल मिटच्या माध्यमातून क्लबची संपूर्ण माहिती घेतली. तसेच विपनेट या संस्थेने जाहीर केलेल्या देशातील सर्वात प्रशंसनीय कार्य करणाऱ्या ३०५ क्लबच्या यादीत या क्लबचा समावेश करण्यात आला आहे. या क्लबच्या कार्यावर आधारित राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेत पुणे जिल्ह्यात दुसरा क्रमांक आला आहे. या क्लबचे संयोजक व शाळेचे उपशिक्षक उमेश नेवसे व किरण कांबळे आहेत. शाळेतील उपशिक्षक नेताजी आरडे यांना 'लीप फॉर वर्ड' या संस्थेच्या इंग्रजी वाचन स्पर्धेत राज्यातील बेस्ट टीचर पुरस्कार मिळाला आहे.

या संस्थेच्या फोनेटिक्सवर आधारित वाचन प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांच्या इंग्रजी वाचन क्षमतेत सुधारणा झाली आहे. शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र प्रमुख प्रवीण इंदलकर, मुख्याध्यापक भरत शेंडकर, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रामभाऊ राजीवडे, शिक्षक भारत विभूते, वैशाली वाघ, स्नेहलता भोसले आदी काम करत आहेत. वेल्हे पंचायत समिती येथे नुकतेच नेताजी आरडे यांचा तालुक्याचे सभापती दिनकर धरपाळे, उपसभापती अनंता दारवटकर, जिल्हा परिषद सदस्य दिनकर सरपाले, अमोल नलावडे, सीमाताई राऊत, संगीताताई जेधे, विशाल शिंदे, कामलाकांत म्हेत्रे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वेल्हे बुद्रुकचे सरपंच संदीप नगीने यांनीही शाळेच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

वेल्हे (ता. वेल्हे) : शाळेत विज्ञानाचे विविध प्रयोग करताना शिक्षक आणि विद्यार्थी.

"तोरणा फोर्ट क्लबच्या माध्यमातून येथील विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासात वाढ झाली असून, मुलांना कृतिशील शिक्षणाची आवड निर्माण झाली आहे.
-भरत शेंडकर, मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, वेल्हे बुद्रुक

Pune, District-Today
06/07/2021 Page No. 3

आमची शाळा अशा उपक्रमांच्या माध्यमातून एकविसाव्या शतकातील सुजाण नागरिक घडविण्याचा प्रयत्न करत आहे. या उपक्रमांमध्ये शाळेचे मुख्याध्यापक श्री. भरत शेंडकर, शिक्षक श्री. किरण कांबळे, श्री. भारत विभुते, श्री. नेताजी आरडे, श्रीमती वैशाली कदम यांचे व पंचायत समिती वेल्हे येथील सर्व अधिकारी यांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळत असते. अशा अनेक उपक्रमामुळे विद्यार्थी व शाळा विकास साधला जात आहे. शासनाच्या आदर्श शाळा या उपक्रमांतून आमच्या सह राज्यातून निवडलेल्या सगळ्या शाळा भारताच्या उज्ज्वल भविष्याचे शिलेदार तयार करणार यात अजिबात शंका नाही.

उपक्रम घेतलेल्या कार्यक्रमाच्या लिंक

६) **शाळा स्तरीय विज्ञान प्रदर्शन :** विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या वैज्ञानिक सर्जनशीलतेला संधी

- बालभारती तर्फे राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित विशेष मार्गदर्शन सत्रात घेतलेले सत्र :
  चंद्र व चंद्राच्या कला : https://youtu.be/ZHd0ršyVhGo
- ATM मस्ती की पाठशाला मधील विज्ञानातील गमती जमती हा कार्यक्रम :
  https://youtu.be/yheEZsCdHsY
- ATM मस्ती की पाठशालाभाग ३ उजळणी
  गृह ते ग्रह : https://youtu.be/BQVp3fwtUDM²
- मिलाप या कार्यक्रमाची लिंक : https://www.lightbenders.net/events/milap

श्री. उमेश अर्जुनराव नेवसे
उपशिक्षक व समन्वयक
तोरणा फोर्ट विज्ञान क्लब
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेल्हे बु., पुणे
ई–मेल आयडी : umeshan.1610gmail.com

# मातृभाषा शिक्षणातून साधले गुणवत्तेची वाट

## मातृभाषेतून शिक्षण व पालकांचा कल

इंग्रजी माध्यमाचे स्तोम वाढलेल्या काळात खासगी शाळांसारख्या भौतिक सुविधा आणि शैक्षणिक तंत्रज्ञान विद्यार्थ्यांना उपलब्ध करून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे काम धानोरे (ता. खेड, जि. पुणे) या पुणे जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेमध्ये होत आहे. त्यामुळेच परिसरातील पालकांचा आपला पाल्य या शाळेत प्रविष्ट करण्याकडे पालकांचा कल वाढला आहे.




इंग्रजी माध्यम शाळांच्या आकर्षणामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांवर परिणाम होत असताना विद्यार्थ्यांना पुन्हा मराठी माध्यमाकडे आकर्षित करण्यासाठी अनेक शाळा व शिक्षक प्रयत्न करीत आहेत. त्यापैकी आमची आदर्श धानोरे शाळा ही एक आहे.

## पटसंख्या वृद्धी

आळंदी जवळील धानोरे ही शाळा सुसंस्कारित मने घडविणारी, मातृभाषेतून गुणवत्तापूर्ण शिक्षण देणारी, आधुनिक तंत्रांचा अवलंब करणारी आदर्श शाळा म्हणून ओळखली जाते. २०१२ साली २४० विद्यार्थी असलेल्या या शाळेत आता पहिली ते आठवीमध्ये तब्बल ९५६ विद्यार्थी शिक्षण घेत आहे.



धानोरे गावापासून थोडी दूर, डोंगरावर शांत व रम्य परिसरामध्ये ही शाळा वसली आहे. सभोवतालची वृक्षसंपदा, प्रशस्त क्रीडांगण आणि हिरवळीने नटलेला सुंदर परिसर विद्यार्थ्यांचेच नव्हे तर भेट देणाऱ्या प्रत्येकालाच मोहून टाकतो. अशा निसर्गरम्य वातावरणात शाळेची दुमजली प्रशस्त इमारत असून शाळेत प्रोजेक्टर ई-लर्निंग संच, इंटरनेट सुविधा, सीसीटीव्ही कॅमेरे अशा भौतिक, तांत्रिक सुविधा उपलब्ध केलेल्या आहेत.

### उत्कृष्ठ लोकसहभाग



गुणवत्तेबरोबरच स्वच्छतेचा मंत्र जपणाऱ्या या शाळेमध्ये रोटरी क्लब ऑफ पुणे सेंट्रल, मधूभाऊ राठी चॅरिटी ट्रस्ट यांच्याकडून भौतिक गरजा भागविण्यासाठी सहकार्य मिळाले आहे. तीस संगणक असलेली स्वतंत्र वर्गखोली, सुसज्ज प्रयोगशाळा, आठ प्रोजेक्टर्स, ई–लर्निंग संच, इंटरनेट, फर्निचर, ग्रंथालयासाठी पुस्तके, कपाटे, वॉटर फिल्टर, क्रीडा साहित्य अशी सुमारे एक कोटी रुपयांची मदत या संस्थांनी केली आहे. पूर्वीच्या २० वर्गखोल्यांबरोबरच १२४०० स्क्वेअर फुटाचा हॉल असून नवीन ७ खोल्यांचे काम प्रगतीपथावर आहे. त्यासाठी इन्व्होल्युट टेक्नॉलॉजी, कैलाश वाहन उद्योग व पुष्पक



स्टील, इंद्रायणी फेरोकास्ट अल्पला इंडिया प्रायव्हेट ली, ग्रोव्हर अँड वाईल इंडिया ली, खोसला इंजिनिअरिंग या स्थानिक कंपन्या व ग्रामपंचायत धानोरे यांचे सहाय्य लाभले आहे. याशिवाय स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, हात स्वच्छ धुण्याची व्यवस्था, सौरदिवे अशा सुविधा ग्रामपंचायत मार्फ़त व लोकसहभागातून उभ्या केल्या आहेत.

### सहशालेय उपक्रम

शाळेमध्ये विविध शालेय व सहशालेय उपक्रम राबविले जात असून त्यामध्ये इंग्रजी, गणित, विज्ञान या विषयांची अधिकची तयारी, विविध स्पर्धा परीक्षाचे मार्गदर्शन व तयारी करुन घेतली जाते. त्यासाठी शालेय वेळेव्यतिरिक्त जादा तासांचे आयोजन केले जाते. याशिवाय वाचन, संगीत, कला, नृत्य, नाट्य, क्रीडा या उपक्रमांमध्येही विद्यार्थ्यांना प्रशिक्षित केले जाते. त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा, राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक प्रज्ञाशोध (NMMS), नवोदय परीक्षा या स्पर्धा परीक्षांमध्ये जिल्हा व राज्यगुणवत्ता यादीमध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने झळकले आहेत.



### कला, क्रीडा व संस्कृती

चित्रकला परीक्षेमध्येही विद्यार्थी यशस्वी होत आहेत. विज्ञान प्रदर्शन, यशवंत कला क्रीडा महोत्सवामध्ये शाळने घवघवीत यश संपादन केले आहे. सलग दोन वर्षे तालुका चॅम्पियनशिप मिळवून जिल्हा स्तरावर लेझीम



स्पर्धेतही प्रथम क्रमांक पटकाविला आहे. नृत्य मल्हार या राज्यस्तरीय लोकनृत्य स्पर्धेमध्ये प्रथम, द्‌वितीय क्रमांक पटकाविले आहेत.

विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागावी म्हणून सुसज्ज ग्रंथालय असून वाचनासाठी परिसरात वाचन कट्टे तयार केले आहेत. विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या वाढदिवशी शाळेला पुस्तक भेट दिले जाते.

### उपस्थिती

विद्यार्थ्यांची शंभर टक्के उपस्थिती राखण्यासाठी विद्यार्थ्यांना खास उपस्थिती बॅग्ज दिला जातो. शंभर टक्के उपस्थिती असणाऱ्या वर्गासमोर उपस्थिती ध्वज ठेवला जातो. दर शनिवारी दप्तरमुक्त शाळा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना संधी दिली जाते. ऑनलाईन चाचण्या तयार करुन पालकांच्या ग्रुपवर पाठवून विद्यार्थ्यांना घरचा अभ्यास दिला जातो. कला, कार्यानुभव, संगणक शिक्षणासाठी लोकसहभागातून स्वतंत्र शिक्षकांची नेमणूक केली आहे. शालेय स्वच्छतेसाठी व सुरक्षेसाठी स्वतंत्र कर्मचारी नेमण्यात आले आहेत.

पारंपरिक व साचेबद्‌ध पद्‌धतीने न जाता वेगळ्या वाटा चोखाळणारे कर्तव्यदक्ष शिक्षक, त्यांच्यातील अंगभूत गुणांना हेरुन त्यानुसार काम करवून घेणारे व प्रशासनाची जबाबदारी समर्थपणे सांभाळणारे मुख्याध्यापक सत्यवान लोखंडे सर यांचे प्रयत्न व शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामपंचायतीचे संपूर्ण सहकार्य, स्वयंसेवी संस्था, कंपन्या यांचे आर्थिक पाठबळ यामुळे धानोरेची शाळा जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात एक प्रेरणादायी शाळा म्हणून नावारूपाला आली आहे. २०१८ साली जिल्हा परिषदेचा दुसऱ्या क्रमांकाचा आदर्श शाळा चषक तर २०१९ साली प्रथम क्रमांकाचा मानाचा अध्यक्ष चषक शाळेने पटकाविला आहे. महाराष्ट्र शासनाच्या आंतरराष्ट्रीय शाळा या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमध्ये तेजस शाळा म्हणून निवड झाली आहे. शाळेची गुणवत्ता व नावलौकिक ऐकून पुणे, सातारा, जळगाव या जिल्ह्यांतील अनेक शिक्षक, मुख्याध्यापक व व्यवस्थापन समिती पदाधिकाऱ्यांनी शाळेला भेटी दिल्या आहेत.



सत्यवान लोखंडे
मुख्याध्यापक
धानोरे, जि. पुणे.

# उपक्रमातून आनंददायी शिक्षण

निसर्ग समृद्ध अशा कोकण किनार पट्टीवर वसलेले गाव म्हणजे 'उभादांडा'. संपूर्ण भारत देश १८५७ च्या पहिल्या स्वातंत्र्य समरातून एका विचित्र स्थित्यंतरातून प्रवास करीत होता अन् नेमक्या याच वेळी म्हणजे १ एप्रिल, १८६५ रोजी उभादांडा गावी प्राथमिक शाळेच्या रूपाने एका शैक्षणिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली गेली. सन २०१५ मध्ये शाळेचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव संपन्न झाला. माजी आमदार कै. काकासाहेब चमणकरांसारखे कृषीरत्न, समाजकारणी व बी. एन. आडारकरांसारखे देशाच्या सर्वोच्च वित्तीय संस्थेच्या म्हणजेच रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरपदी विराजमान अर्थतज्ज्ञ असे एक ना अनेक विद्यार्थ्यांनी या शाळेत शेणाने सारविलेल्या जमिनीवर बसूनच यशाची धुळाक्षरे गिरविली.

जीवन शिक्षण शाळा उभादांडा नं.१ चे नामकरण आता जि.प.पू.प्रा.केंद्रशाळा उभादांडा नं.१ असे करण्यात आले आहे. स्वातंत्र्या नंतरच्या काळात शिक्षणाबरोबर मुलोद्योग म्हणून सुतारकाम व शिवणकाम शिकविले जाई. सर्व शिक्षा अभियानातून दुमजली इमारत प्राप्त झालेल्या शाळेत सुसज्ज संगणक कक्ष, प्रयोगशाळा तसेच ई–लर्निंग सारख्या सुविधा आहेत. यांमुळेच गतवर्षी म्हणजेच सन २०२०–२०२१ या शैक्षणिक वर्षात महाराष्ट्र सरकारने जाहीर केलेल्या पहिल्या टप्प्यात 'मॉडेल स्कूल' म्हणून या शाळेचा समावेश करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात त्यामध्ये जयंत्या, पुण्यतिथ्या, सहशालेय उपक्रम, विविध स्पर्धा त्याचबरोबर खालील विशेष उपक्रम राबविले जातात.




१) **योगासने :** कोरोना सारख्या महामारीच्या काळात विशेष कौतुक झाले ते या योगासन उपक्रमाचे.शाळेतील उपशिक्षक श्री. दिलीप आप्पासो माने हे योगाची परीक्षा उत्तीर्ण होऊन 'योग शिक्षक' बनले त्यांनी मुले, पालक, व तालुक्यातील शिक्षकांसाठी ऑफलाईन व ऑनलाईन योग प्रशिक्षणाचा उपक्रम राबविला.

२) **कवायत :** दर शनिवारी सकाळी मुलांची कवायत घेतली जाते पंचरंगी कवायत करण्यासाठी प्रयत्न असून ग्रामपंचायतकडून साहित्य पुरविण्यात येणार आहे.

३) **व्हर्च्युअल क्लासरूम :** सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून व्हर्च्युअल क्लासरूम सुविधा प्राप्त आहे.

४) **नावीन्यपूर्ण विज्ञान प्रयोगशाळा :** सर्व शिक्षा अभियानातून सदरची प्रयोग शाळा सन २०१९-२०२० या वर्षी प्राप्त झाली आहे.



५) **इंग्लिश स्पिकिंग कोर्स :** शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून सदरचा उपक्रम सुरू आहे. इयत्ता तिसरी ते सातवी च्या मुलांना इंग्रजी संवादासाठी बाह्य प्रशिक्षकाच्या मदतीने मार्गदर्शन केले जाते. याचा आर्थिक भार पालक व शतकोत्तर सुवर्ण महोत्सव समितेने उचलला आहे.

६) **सर्व वर्ग डिजीटल :** संपूर्ण शाळा डिजिटल करण्याच्या उपक्रमास ग्रामस्थ, माजी विद्यार्थी, शतकोत्तर सुवर्ण महोत्सव समिती, ग्रामपंचायत उभादांडा यांनी सहकार्य केले. शाळेला शैक्षणिक उठावातून सहा टी.व्ही. संच प्राप्त झाले आहेत.

७) **दप्तरमुक्त शाळा :** विद्यार्थ्यांच्या पाठीवरील ओझे कमी करण्यासाठी जि. प. सिंधुदुर्ग यांनी जिल्हा वार्षिक नावीन्यपूर्ण योजना सन २०२०-२०२१ योजनेतून मुलांना १०५ लॉकर पुरविले आहेत.

८) **इंटरनेट सुविधा :** सर्व शिक्षा अभियानातून व दानशूर व्यक्तींकडून प्रापतसंगणक संचांमुळे शाळेत सुंदर संगणक कक्ष तयार केला आहे. या संगणक कक्षात दानशूर व्यक्तींच्या योगदानातून कक्ष उभा आहे.

९) **मासिक पाळी व्यवस्थापन :** किशोरवयीन मुलींना मासिक पाळी व्यवस्थापना संदर्भात शाळेच्या शिक्षिका श्रीम. मनाली कांबळी या मार्गदर्शन करतात.



१०) **स्काऊट/गाईड :** इयत्ता सहावी व सातवी च्या मुलांचे स्काऊट व गाईड पथक स्थापन करण्यात आले असून स्काऊट मास्टर म्हणून श्री. दिलीप माने व गाईड कॅप्टन श्रीम. मनाली कांबळी काम पाहतात.

११) **शैक्षणिक सहल :** मुलांची शैक्षणिक सहल व वनभोजन कार्यक्रम या शाळेत विशेष पद्धतीने राबविले जातात. मुलांसोबत पालकही या कार्यक्रमात सहभागी होतात.

१२) **शिष्यवृत्ती मार्गदर्शन :** शाळेतील पाचवीच्या मुलांना शिष्यवृत्ती मार्गदर्शन रोज सकाळी ९.३० ते १०.३० या वेळेत ज्यादा मार्गदर्शन होते. या शाळेचे सन १९८८ पासून ६९ विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक आहे.


श्री. झेड. एम. घाडी

मुख्याध्यापक

केंद्रशाळा उभादांडा नं. १, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग

# समस्येवर करूया मात

जून महिन्यात शाळेस सुरुवात झाली आणि आम्हां शिक्षक बांधवांकडे यावर्षी जो वर्ग आला त्याबद्दल मला प्रश्न पडला की या मुलांना शिकवू कसे? शाळा तर बंद! मग ऑनलाईन कसे शिकवू? असे खूप प्रश्न पडले. मग आम्ही सुरुवातीस गुगल मीट आणि झूम च्या माध्यमातून ऑनलाईन क्लास सुरू केला. लहान मुले असल्याने पहिल्या आठवड्यात खूप समस्या आल्या पण आम्ही थांबलो नाहीत. काम सुरूच ठेवले, दररोज २-३ तास न चुकता क्लास सुरू असायचे.

- आदर्श शाळेसाठी किलबिल सारखी नवनवीन उपक्रम देण्यात आले होते. याचा आम्हांला खूप फायदा झाला. मुलांकडून तो करून घेतला. त्याचे व्हिडीओ बनविले, पालकांनी इतर मुलांनी साहाय्य केले. यामुळे खऱ्या अर्थाने मुले अभ्यासाकडे वळली.
- ज्या मुलांकडे फोन नाही त्यांच्या घरी जाऊन आम्ही घराच्या ओसरीत, मैदानात बसून त्यांना अक्षर ओळख करून दिली. गावातील तरुण मुलांचे सहकार्य घेऊन मुलांची शैक्षणिक गती वाढविली.
- मुलांना Phonetic पद्धतीने a, b, c, d चे ध्वनी शिकविले. आज आमच्या शाळेतील मुले न भिता इंग्रजी वाचन करत आहेत. पालक ही यामुळे इंग्रजी साक्षर झाली आहे. यासाठी आम्ही सर्व शिक्षकांनी या पद्धतीने तयारी करून घेतली.

  मुलांना सर्वप्रथम लहान लिपीतील a, b, c, d शिकविली व a to z अक्षरांचे उच्चार, ध्वनी शिकविले. ऑनलाईन क्लास असल्यामुळे मुलांसोबत आजी, आई, पालक असायचे, मुलांना आनंद वाटत होता.

  दुसऱ्या १५ दिवसांत a, e, i, o,u या पाच स्वरासोबत two boQ>a words फोनेटिक चा सराव घेतला. मुले आत्मविश्वासाने वाचन करू लागली. तिसऱ्या १५ दिवसांत आम्ही three boQ>a words चा सराव घेतला, ४ लेटर, common words चा सराव घेतला.

  आज आमच्या शाळेतील इयत्ता पहिलीची मुले व पालक आनंदाने इंग्रजी वाचन करत आहेत. मागच्याच आठवड्यात आमच्या तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. राठोड साहेब यांनी मुलांशी भेटून तयारी पाहिली व कौतुक केले.
- अक्षरासाठी आम्ही सर्व शिक्षक बंधू भगिनींनी अक्षर गटांचा वापर केला आणि मुलांचे अक्षर या तीन महिन्यात छान झाले आहे. यासाठी आम्हांला आमच्या शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुभाष चिंचाणे, केंद्रप्रमुख श्री. टेंगसे यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांनी शाळेत मीटिंग मध्ये सांगितले की, पहिलीचा वर्ग आणि तुम्ही कसे शिकविणार? कसे मूल्यमापन करणार? तर यासाठी माता-पालक यांची मदत घ्या, आज इयत्ता पहिलीत आलेल्या मुलांचे आई-वडील किमान सातवी पर्यंत तरी शिकलेले आहेत

आणि आम्ही पहिलीची शिक्षक कामाला लागलो. आमचे पालक दिलेला अभ्यास करून घेऊन फोटो पाठवितात.

- इयत्ता पहिलीची मुले बेरीज-वजाबाकी करत आहेत, गणित ही मुलांना गाणे गप्पांच्या माध्यमातून जवळचे बनले आहे.
- गटशिक्षणाधिकारी आदरणीय राठोड साहेब, शाळेचे मुख्याध्यापक यांनी मुलांना गटअध्यापन करून शिक्षण द्यावे अशा सूचना दिल्या. यानुसार ८-१० मुलांचा ग्रुप करणे, नियमित गृहकार्य देणे, तपासणे, आवश्यक त्या सूचना देणे, पालकांच्या समन्वयाने शिक्षण सुरू ठेवल्याने मुलांची प्रगती झाली.

ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पद्धतीने शिक्षण सुरू आहे, ज्या मुलांकडे साधे फोन आहेत, ज्यात whats app नाही असे, त्यांना साधा कॉल करत असतो. मुलांना वाचन करायला लावणे, शब्द विचारणे एखादे बडबडगीत म्हणायला लावणे यामुळे, मुले १०० टक्के शिक्षण प्रवाहात आली आहेत.




राज्य शासनाने आदर्श शाळांची निवड केली, त्यात आमच्या शाळेची निवड झाली असून, नवीन पाठ्यपुस्तक इयत्ता पहिलीसाठी आला आहे, त्यामुळे मुले खूप आनंदाने शिकत आहेत, मुलांची प्रगती पाहून यावर्षी इयत्ता पहिलीचा पट १२० वरून १६० झाला आहे. परिसरातील उर्दू, इंग्रजी माध्यमाची मुले आमच्याकडे आली आहेत.

शाळेत सर्व वर्गांचे ऑनलाईन शिक्षण सुरू आहे. आठवीचे वर्ग सुरु झाले असून, इयत्ता पहिली ते सातवी चे वर्ग गट पद्धतीने चालू असतात. आमच्या शाळेत इतरही वर्गांचे याच पद्धतीने काम चालू असून, शाळेची पटसंख्या ११६० झाली आहे. इयत्ता आठवी पर्यंतचे वर्ग असून ३० शिक्षक काम करत आहेत. सर्व शिक्षक एकमेकांना मार्गदर्शन करत असतात व माझा वर्ग कसा पुढे जाईल याची एकमेकांमध्ये स्पर्धा असते.

या वर्षी इयत्ता आठवी NMMS परीक्षेत २२ विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाले आहेत.

या बरोबरच या आमच्या शाळेत संस्कृत, जापनीज या भाषा ही इच्छुक मुलांना शिकविल्या जातात, क्षेत्र भेट, रात्र अभ्यासिका हे उपक्रम राबविले जात आहेत.



श्री. विजय ज्ञानोबा माळी

भारतरत्न श्री. अटलबिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय

जिल्हा परिषद शाळा माळीवाड़ा

ता. पाथरी, जिल्हा. परभणी.

- **संदर्भ लिंक :** School blog -https://zppsmaliwadapathri.blogspot.com/p/blog-pageš50.html

# आदर्शाच्या दिशेने

**विद्यार्थी उपस्थितीमध्ये संख्यात्मक वाढ :**

महाराष्ट्र राज्य शासनाने घोषित केलेल्या ४८८ आदर्श शाळांमध्ये आमची प्रशाला जि. प. प्राथ. शाळा दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगलीची निवड झाली. त्यामुळे आमच्या गावासाठी ही अभिमानाची बाब ठरली. आमच्या शाळेची आदर्श शाळेमध्ये निवड झाल्यामुळे मुलांचा कल वाढल्याने येतो. शाळेचा पट माहे जून २०२१ मध्ये ३२० झाला. शाळा जसजसा ऑफलाईन चालू झाल्या. त्यावेळी म्हणजे १५ सप्टेंबर पासून आमच्या शाळेचा पट पुढील १५ दिवसांत ६० ते ७० ने वाढला. माहे डिसेंबर अखेर आमच्या शाळेचा पट ३८५ आहे. भविष्यामध्ये शाळेचा पट अधिक उंचावणे.

शाळेच्या पट वाढीसाठी दरवर्षी पटनोंदणी पंधरवडा साजरा करतो. तसेच शाळा सुरू होण्यापूर्वी आम्ही आमच्या गावात, शाळेमध्ये असणाऱ्या शासकीय सुविधांचा विद्यार्थ्यांना होणारा लाभ उदा. सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, मोफत पाठ्यपुस्तक, मोफत गणवेश, अपंग भत्ता, दिव्यांग विद्यार्थी, शाळेमध्ये राबविले जाणारे उपक्रम उदा. आठवडा बाजार, क्षेत्र भेटी, शैक्षणिक सहल, मैदानी, वैयक्तिक व सांघिक खेळाच्या स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, बौद्धिक स्पर्धा, विविध समाजसुधारक यांच्या जयंती, पुण्यतिथी साजरी करणे आणि महत्त्वाचे म्हणजे शाळेची गुणवत्ता म्हणून विविध स्पर्धा परीक्षेमध्ये नावलौकिक मिळविला आहे. यामध्ये इ. चौथी स्कॉलरशिप परीक्षेमध्ये दरवर्षी आमच्या शाळेची विद्यार्थी तालुका, जिल्हा तसेच राज्य स्तरावर गुणवत्ता यादीत येतात. तसेच स्कॉलरशिप व्यतिरिक्त आमच्या शाळेचे विद्यार्थी (पहिली ते चौथी) खाजगी स्पर्धा परीक्षेतही उत्तुंग भरारी घेतात. अशा व विविध उपक्रमांचा आम्ही एक व्हिडीओ क्लिप (१० ते १५ मिनिटे) तयार करून गावामधील विविध ठिकाणी प्रदर्शित करतो. त्यामुळे पालकांमध्ये शाळेविषयीची ओढ आपुलकी निर्माण होते आणि त्याचा परिणाम म्हणून पटामध्ये भरपूर प्रमाणात वाढ झालेली दिसून येते.



**शालेय परिसरातच पूर्व प्राथमिकचे वर्ग :**

आमचा शाळेचा परिसर ७२ आर. एवढा मोठा आहे. या परिसरामध्ये पूर्व प्राथमिक वर्ग सुरू आहेत. याचाच सकारात्मक परिणाम म्हणजे प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या सानिध्यात हे विद्यार्थी असल्याने शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी होतो. आदर्श शाळा निवड झाल्यामुळे शाळेचा पट भविष्यात ५०० ते ६००

च्या दरम्यान राहील. किंबहुना त्याही पेक्षा जास्त असू शकेल. त्यामुळे भविष्यात शाळेसाठी विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या वर्गखोल्या तसेच इतर सुविधा लक्षात घेता, शाळेसाठी १२ खोल्यांची भव्य अशी सुसज्ज इमारत उभारण्याचे ठरले आहे.



**शाळा : एक गुणवत्ता समितीचे गठन व सनियंत्रण :**

शाळा– एक समूह, माझी जबादारी, माझी शाळा, माझे विद्यार्थी अशा प्रकारची विचारधारा मनात धरून गावचे प्रथम नागरिक सरपंच यांनी या आदर्श मॉडेल स्कूलवर विकासासाठी एक समिती नेमली आहे. या समितीमध्ये विविध क्षेत्रांतील मान्यवरांना प्राधान्य दिले आहे. त्यामध्ये वैज्ञानिक क्षेत्रातील, शैक्षणिक क्षेत्रातील, प्रतिष्ठित व्यापारी, मेडिकल विभाग, ज्वेलर्स विभाग, वार्ताहार, माजी सैनिक, शेतकरी इत्यादी भविष्यामध्ये या सर्वांच्या माध्यमातून आपल्या शाळेसाठी लोकवर्गणीतून मोठ्या प्रमाणात निधी व शाळेसाठी लागणारे साहित्य उपलब्ध करून घेता येईल.



**शालेय भौतिक साधन सुविधा :**

प्रस्तावित होणाऱ्या या सुसज्ज इमारतीत मुला–मुलींकरिता व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र, पुरेशी स्वच्छता गृहे निश्चित व नियोजित केलेली आहेत. तसेच पेयजल सुविधा व हँडवॉश स्टेशनचे काम पूर्णत्वाकडे आहे. मध्यान्ह भोजनाकरिता स्वयंपाकगृह व भांडार कक्ष नियोजित आहे. तसेच शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य, ग्रंथालय, वाचनालय, संगणक कक्ष तसेच प्रयोगशाळा प्रत्येकी एक खोली नियोजित व सुसज्ज तयार करण्याचे ठरले आहे.

नियोजित १२ खोल्यांची भव्य, सुसज्ज इमारत, Virtual Class सारखीच आहे. शाळेत विद्युतीकरण केलेले आहे. सौरपॅनेलचे कामही नियोजित आहे. शाळेला लागणारे चारही बाजूंनी संरक्षक भिंत आहे.

सुसज्ज व भव्य इमारतीमध्ये कोणत्याही प्रकारची आपत्ती उद्‌भवू नये म्हणून आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टिकोनातून शाळेतील अग्निशामक यंत्रणेसह सुनियोजन सुविधा प्रस्तावित आहे.



**शैक्षणिक गुणवत्ता वाढ :**

शाळेमध्ये उत्कृष्ट अध्यापन करणाऱ्या व विविध क्षेत्रात आवड असणाऱ्या शिक्षकांना देशांतर्गत व देशाबाहेर प्रशिक्षणास पाठविणे प्रशासनाच्या माध्यमातून ठरले आहे. इ. पाचवीत होणाऱ्या पूर्व प्राथमिक शिष्यवृत्तीसाठी चांगल्या प्रकारे उपयोग




होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीबरोबर शाळेचाही नावलौकिक झालेला दिसून येतो.

तसेच सुसज्ज व भव्य १२ खोल्यांच्या इमारतीसाठी साधारणपणे दीड ते दोन कोटींचा निधीचे आहे. लोकसहभागातून शाळेतील माजी विद्यार्थी संपर्क यादी करुन निधी उपलब्ध करणे. तसेच म.न.रे.गा. या योजनेमधून क्रिडांगण मंजूर झाले आहे. (निधी १० लाख रुपये). तसेच समितीच्या माध्यमातून व शालेय व्यवस्थापन समितीच्या सहकार्याने लोकांशी संपर्क साधून मॉडेल स्कूलसाठी शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य, संगणक कक्ष अशा प्रकारे शाळेसाठी उपयुक्त लागणारे सर्व साहित्य मिळविण्याचे सर्वांच्या सहकार्याने मिळविण्याचा मानस केलेला आहे.

**उपक्रम व्हिडिओ लिंक** : https://youtu.be/lGXPVQ9djSs

मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंद
जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा,
दिघंची, ता. आटपाडी, जि. सांगली

# आदर्श शाळांच्या अनुषंगाने सुरू असणारे उपक्रम







09:00